मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/११९/तक्रार क्रमांक ७४३/०१

श्री. ए. जे. जॉन -----तक्रारदार
फ्लॅट नं. २८१, तळमजला,
गोपाळ निवास, शेर-ए-पंजाब,
महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ९३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
मुख्य शिधावाटप अधिकारी
अलका बिल्डींग, ३ रा मजला,
बस डेपोसमोर, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

२. जन माहिती अधिकारी
मुख्य शिधावाटप अधिकारी
अलका बिल्डींग, ३ रा मजला,
बस डेपोसमोर, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

*---विवेचन---*

तक्रारदार श्रीयुत ए.जे. जॉन यांनी दि. ८/१२/२००९ रोजी मुख्य शिधावाटप अधिकारी, अंधेरी (पूर्व) यांना अर्ज करुन त्यांचे रेशन कार्ड रद्द करण्याची कारणे विचारली होती. त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे दि. १२/१/२०१० रोजी आयोगाकडे तक्रार केलेली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. ५/४/२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिका-यांनी हे स्पष्ट केले की, तक्रारदार यांची शिधावाटपपत्रिका रद्द करण्यात आली नव्हती तर ती स्थलांतरित करण्यात आलेले आहे असे दि. ५/१/२०१० रोजीच्या पत्राने तक्रारदारांस कळविण्यात आले होते व तक्रारदारांनी दि. २०/१/२०१०

**रोजी प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन सदर पत्राची प्रत प्राप्त करुन घेतलेली आहे. कदाचित त्यामुळेच ते सुनावणीसाठी गैरहजर राहिले असावेत.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: ०५.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४४४१३/तक्रार क्रमांक ६३६/०१

श्री. बाळकृष्ण दशरथराव काळे -----तक्रारदार
१३/४१, त्रिवेणी को.ऑप.हौ.सो.
ओशिवरा, जोगेश्वरी ,मुंबई ४०० १०२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
भारतीय विद्याभवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी
महाविद्यालय, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.

२. जन माहिती अधिकारी
भारतीय विद्याभवनचे सरदार पटेल अभियांत्रिकी
महाविद्यालय, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.

***---विवेचन---***

तक्रारीचा दिनांक ७/९/२००९
सुनावणीची तारीख ५/४/२०१०

तक्रारदार श्रीयुत काळे यांनी दि. ७/९/२००९ रोजी आयोगाकडे केलेल्या तक्रारीत सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केले आहे अशी तक्रार केली आहे.

तक्रारदारांनी संस्थेस मिळणारे अनुदान, संस्थेचे पदाधिकारी यांची नांवे, पत्ते व दुरध्वनी क्रमांक, महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुखांनी केलेला युरोप व अमेरिका दौरा वगैरे बाबत माहिती मागितली होती. ती माहिती दिलेली असल्याचे सांगून तक्रारदारांच्या प्रत्येक मुद्दयाचा परामर्श घेणारे विस्तृत निवेदन आयोगास दिलेले आहे.

तक्रारदार सुनावणीच्या वेळेला उपस्थित राहिले नाहीत व आयोगाकडे झालेल्या याअगोदरच्या अपीलामध्ये सुध्दा उपस्थित राहिले नाहीत. तसेच त्यासंदर्भात त्यांची कारणे देणारे

**पत्रहि दिले जात नाही हेहि जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनाला आणले.**

**तक्रारदारांच्या अर्जास दिलेली माहिती याचे अवलोकन केले असता तक्रारदारांस माहिती दिलेली आहे असेच दिसून येते. मात्र एका अर्जाच्या बाबतीत माहिती देण्यास विलंब झालेला आहे, याची पुनरावृत्ती टाळावी.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक: ०६.४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक ७३३/०१**

**श्री. रामचंद्र ज्ञानू उथळे -----तक्रारदार**
**जलदर्शन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं. ६७/२०४, गोराई- २,**
**बोरीवली (पश्चिम) मुंबई ४०० ०९२.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक कार्यालय बृहन्मुंबई,**
**पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ६०**
**२. जन माहिती अधिकारी**
**शिक्षण उपनिरीक्षक, के.पी. पूर्व विभाग,**
**बृहन्मुंबई पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ६०.**

***---विवेचन---***

**तक्रारीचा दिनांक ३/१०/२००९**
**सुनावणीची तारीख ५/४/२०१०**

**तक्रारदारांच्या तक्रार अर्जात त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र मुख्याध्यापक सानेगुरुजी रात्र विद्यालय व संस्थेचे अध्यक्ष विद्यार्थी हितवर्धीनी मंडळ यांनी आयोगास, तक्रारदारांस कोणती कोणती माहिती देण्यांत आलेली आहे याचा तपशील सादर केलेला आहे. रु. १९२/- शुल्क असलेली माहिती तक्रारदारांस देण्यात आलेली आहे असेहि निवेदन दिलेले आहे.**

**तक्रारदारांस दिलेल्या माहिती व्यतिरिक्त आणखी कांही माहिती पाहिजे असेल तर माहितीची सत्यता पडताळून पहायची असेल तर तक्रारदार नस्तीचे अवलोकन करु शकतात असे त्यांना सांगितले. तक्रारदारांनी याबाबतीत मुख्याध्यापकांशी संपर्क साधून भेटीची वेळ कळविण्यात येईल व त्यानंतर नस्तीची तपासणी घेण्यात येईल असे आयोगास सांगितले.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ०६.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक ७४४/०१**

**श्री. रामचंद्र ज्ञानू उथळे -----तक्रारदार**
**जलदर्शन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं. ६७/२०४, गोराई- २,**
**बोरीवली (पश्चिम) मुंबई ४०० ०९२.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक कार्यालय बृहन्मुंबई (पश्चिम)विभाग,**
**जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ४०० ०६०**
**२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक**
**के.पी. पूर्व विभाग, जोगेश्वरी (पूर्व)**
**मुंबई ४०० ०६०.**

***---विवेचन---***

**तक्रारीचा दिनांक ३/१०/२००९**
**सुनावणीची तारीख ५/४/२०१०**
**तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**आयोगाने दिलेल्या अपील क्र. ४३०७/०२ मधील दि. ४/५/२००९ रोजीच्या आदेशान्वये सुनावणी झाली. मात्र त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी तक्रार केलेली आहे.**

**सुनावणीच्या वेळेला तक्रारदारांस हवी असणारी माहिती संस्थेकडे आहे व ती संस्थेकडून ती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.**

**तक्रारदारांस यासंदर्भात शिक्षण निरीक्षक कार्यालयाकडे असलेली माहिती पाहिजे आहे. तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, तक्रारदार दि. १२/४/२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जातील व त्यांनी संबंधित विषयाची नस्ती दाखवून आणखीन त्यांना कांही अतिरिक्त माहिती पाहिजे असेल तर ती देण्यात यावी.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक: ०६.४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७८२/तक्रार क्रमांक ७३५/०१**

**सौ. उमा अशोक मंचेकर -----तक्रारदार**
**गणेशकृपा सोसायटी, शंकरपाडा नं.२,**
**स्मशान भूमि रोड, डहाणूकरवाडी,**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (दक्षिण विभाग) ----उत्तरवादी**
**स व प जलतरणाजवळ, एम.जी क्रॉस रोड क्र. २,**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

**२. जन माहिती अधिकारी**
**सहायक आयुक्त (दक्षिण विभाग) कार्यालय,**
**स व प जलतरणाजवळ, एम.जी क्रॉस रोड क्र. २,**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

***---विवेचन---***

**तक्रारीचा दिनांक २१/१०/२००९**
**सुनावणीची तारीख ५/४/२०१०**
**तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**तक्रारदारांच्या दि. १३/१०/२००९ रोजीच्या अर्जास दि. १५/१०/२००९ रोजीच्या पत्राने माहिती दिलेली आहे. सुनावणीच्या वेळेला लिंक रोड रस्तारुंदीकरणातील बाधीत असलेल्या बाधीत ४१४ लोकांचा असलेला सर्व्हे, नकाशे तसेच ४१४ लोकांचे सर्व्हेक्षण यादी तक्रारदारांस पुरविण्यात आलेले आहेत.**

**सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, तक्रारदारांस**

**संबंधित विषयाची संपूर्ण नस्ती दाखविण्यात यावी व दिलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त त्यांना आणखीन कांही कागदपत्रे पाहिजे असल्यास तेहि त्याच दिवशी देण्यांत यावेत.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः ०६.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/३३२/तक्रार क्रमांक ७३४/०१**

**श्री. मोहमद अफझल -----तक्रारदार**
**सी/५०८, आकार, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०६१.**

**विरुध्द**

**१. सचिव ----उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

**२. सचिव**
**उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

**३. जन माहिती अधिकारी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

**४.जन माहिती अधिकारी**
**उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

***---विवेचन---***

श्रीयुत मोहमद अफझल यांनी २ मार्च २०१० रोजी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना अर्ज करुन उद्वाहनाबाबत झालेल्या दुर्घटना नमूद करुन उद्वाहनाची देखभाल, दुरुस्ती योग्य प्रकारे व्हावी म्हणून शासन करीत असलेल्या उपाययोजनांच्या बाबतीत त्यांनी जी पत्रे मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाममंत्री, उर्जा सचिव व सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग याना लिहिलेली होती त्याबाबतीत झालेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

तक्रारदारांचे म्हणणे असे की, विषयाचे गांभिर्य लक्षात घेता त्यांना २४ तासाच्या आंत माहिती मिळायला पाहिजे. व त्यांना तशी न मिळाल्यामळे त्यांनी आयोगाकडे दि. १२/३/२०१० रोजी

तक्रार दाखल केलेली आहे.   या तक्रारीची सुनावणी दि. ६/४/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी तसेच विषयाचे गांभिर्य लक्षात घेता सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग  व सचिव, उर्जा विभाग, यांनाहि बोलाविण्यात आले होते.

तक्रारदारांस हवी असणारी माहिती दि. ३/४/२०१० रोजी देण्यांत आलेली आहे.  विषयाचे गांभिर्याविषयी  तक्रारदारांनी केलेला अभ्यास, तसेच दोन्ही विभागांची सचिवांची उपस्थित लक्षात घेता खालील मुद्दे सुध्दा सुनावणीच्या वेळेला प्रकर्षाने नमूद करण्यात आले.

१. उद्‌वाहनाची तपासणी करण्यासाठी ज्या रिक्त जागा आहे त्या भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला जे रेक्वीझेशन दिलेले आहे त्याचा वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणे.

२. सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी उद्‌वाहनाच्या देखभालीच्या बाबतीत बजावावयाची कामगिरी

३. उद्‌वाहनाच्या वापराबाबत व आपत्तीजनक प्रसंग आल्यास ठेवावयाचे प्रसंगावधान व कोणत्या गोष्टी कराव्या व कोणत्या करु नये याबाबत जनतेला करावयाचे प्रबोधन.

याबाबत योग्यती पावले उचलली जातील असे संबंधित सचिवांनी  सुनावणीच्या वेळेस सांगितले.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ०६.४.२०१०

राज्य  मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५७५९/अपील क्रमांक ५५५६/०२

श्री. गणेश किसनराव कोपले -----अपीलार्थी
४/६६, गितांजली समता नगर,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी ----उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक क्र.२
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ५५५६/०२ मध्ये आयोगाने दि. २० मार्च, २०१० रोजी विद्यमान जन माहिती अधिका-यांनी ४ दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती द्यावी. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याबद्दल शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा करावा असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुर्यकांत तेली यांनी आयोगापुढे प्रत्यक्ष उपस्थित राहून पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

" मिळकत व्यवस्थापक-२/मुं.मं. कार्यालयात सहायक मिळकत व्यवस्थापक यांच्या अंतर्गत ५ युनिट क्लार्क असा कर्मचारी वर्ग हया कार्यालयाच्या अखत्यारितील २३ वसाहतीमधील सदनिकांचे हस्तांतरण/नियमितीकरण वसाहतींचा पत्रव्यवहार अभिहस्तांतरण अंतिम यादी माहिती अधिकाराचे प्रकरणे इत्यादी कामे करतात.

लेखाविभागात लेखापाल व अन्य तीन वरिष्ठ लिपिक दर्जाचे कर्मचारी व अभिहस्तांतरण विभागात-२ सीडीओ व भाडेवसुली करिता ५ भाडेवसुलीकार असा एकूण कर्मचारी वर्ग आहे.

माझे कार्यालयातील युनिट विभागातील ५ कर्मचा-यांपैकी १ कर्म चारी सुमारे १ वर्षाकालापासून गैरहजर आहे. उर्वरित चार कर्मचा-यांपैकी ३ कर्मचारी नोव्हेंबर २००८ पासून २१/५/२००९ पर्यंत आठवडयात एक दिवस व ०१ जून २००९ पासून नोव्हेंबर पर्यंत पूर्णतः निवडणूकीचे कामास होते. त्यामुळे मिळकत व्यवस्थापक-२/मुं.मं. या कार्यालयाचे काम करण्यासाठी सदर कर्मचारी उपलब्ध नव्हते. फक्त एकच कर्मचारी युनिट क्लार्क उपलब्ध होता. संबंधित युनिट क्लार्क निवडणूकीचे कामावरुन परत आल्यानंतर माहिती अधिकाराचे माहिती देणेचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आले.

श्री. गणेश कोपले यांनी म्हाडाची दोन घरे एक समतानगर कांदिवली पूर्व व दुसरे मजासवाडी जोगेश्वरी येथील दोन घरांचा लाभ घेतला आहे. समतानगर कांदिवली इमारत क्रमांक ४ खोली क्रमांक ६६ चे निष्कासनाचे आदेश सक्षम प्राधिकारी यांनी १९९९ मध्ये जारी केले तद्नंतर अपील अधिकारी दि. ई २३७ दिनाक २७/०९/१९८९ रोजी सक्षम अधिका-यांचा निर्णय कायम राखला. मा. उच्च न्यायालयाने सुध्दा श्री. कोपले यांचे अपील ११३७५ दि. २७/८/२००९ रोजीचे आदेशान्वये नाकारले आहे. यामुळे श्री. गणेश कोपले हे माहिती अधिका-यांचे अनेक अर्ज या कार्यालयात दाखल केले. श्री. गणेश कोपले यांना, हया कार्यालयाने कार्यालयातील हव्या असलेल्या नस्तीची छाननी करण्याची अनुमती दिली व त्यांनी सांगितलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती देण्यात आल्या आहेत. श्री. गणेश कोपले हे हया कार्यालयात मागील १०-१२ महिन्यापासून नेहमी येतात त्यांना आवश्यक माहिती छायांकित प्रती दिल्या आहेत.

मा.महोदयांना सविनय सादर करण्यात येते की, माझ्याकडे मिळकत व्यवस्थापक-२/मुंबई मंडळ या पदाचे अतिरिक्त कार्यभार दि. ४/७/२००८ ते ०५/०३/२०१० हया कालावधीत होता. सदरहू कार्यभार शिवाय प्रशासकीय अधिकारी/मुंबई मंडळ व सचिव/मुंबई मंडळ हया पदाचे अतिरिक्त कामाचा कार्यभार होता.

श्री. गणेश कोपले यांचा दिनांक १७/०७/२००९ रोजीचा माहिती अधिकाराचे अर्जावर माहिती देण्याचे हेतुपुरस्सर टाळण्यात आलेले नसून संबंधित कार्यालयाचे संबंधित युनिट क्लार्क त्यांचेकडून अनावधानाने माहिती देण्याचे राहून गेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

तरी कृपया उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करुन श्री. गणेश कोपले यांना माहिती विहित मुदतीत दिली नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम कलम २० अन्वये शास्तीचे कार्यवाहीतून क्षमापित करावे ही विनंती. "

अपीलार्थी श्री. कोपले यांनी नस्तीची पाहणी करुन कागदपत्र प्राप्त करुन घेतले आहेत हे लक्षात घेता पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

शास्ती प्रकरण बंद करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ०६.४.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक ६१५/०१

श्री. नरवंदाप्रसाद मिश्रा -----तक्रारदार
राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,
नर्मदा कृष्णा भवन, परेरा वाडी,
साकीनाका, मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई १.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई १.

*---विवेचन---*

श्रीयुत नरवंद प्रसाद मिश्रा यांनी आयोगाकडे, आयोगाने दिलेल्या दि. ३१ डिसेंबर, २००८ रोजीच्या आदेशाचे पालन झाले नाही अशी तक्रार केलेली आहे. यासंदर्भात दि. १९/१/२०१०, व २९/३/२०१० रोजी चौकशी करण्यांत आली.

तक्रारदारांना द्यावयाच्या माहितीच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केलेले आहे.

" अर्जदार श्री. नर्वदा प्रसाद मिश्रा यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात मागितलेली माहिती ही साकीनाका पो.ठाणे गु.र.क्र. ३३५/२००७, कलम ४६५, ४६७,४७१,४२० ,३४ भा.द.वि.स या गुन्हयाशी संबंधित असल्याने सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती (नोटींग) देण्याची तजवीज ठेवण्यात आली होती. त्या अनुषंगाने या कार्यालयास प्राप्त आदेशासंदर्भात दि २७/११/२००९ रोजी विशेष पोटा कक्ष, कक्ष ६, गु.प्र.शा.गु.अ.वि. मुंबई या कक्षाचा जा.क्र.२०४६/विपोक/२००९ अन्वये पोलीस निरीक्षक श्री. अनिल पोफळे यांनी मा. सहायक पोलीस आयुक्त व शासकीय माहिती अधिकारी, गु.शा. मुंबई यांना अहवाल सादर केला होता.

सदर अहवालात संदर्भाधिन प्रकरणाशी संबंधित असलेला साकीनाका पो.ठाणे गु.र.क्र. ३३५/२००७ कलम ४६५,५६७,४७१,४२०,३४ भा.द.वि.स हा गुन्हा "क" वर्गीकरणाकरिता मा.महानगर दंडाधिकारी, २७ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई येथे प्रलंबित असून त्याबाबतचे आदेश झाल्याशिवाय अर्जदाराने मागितलेली टिप्पणीची (नोटींगची) प्रत देता येत नसल्याचे नमूद केले होते.

अर्जदार श्री. नर्वदा प्रसाद मिश्रा यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्याकरिता पुन्हा या कक्षाचा जा.क्र.६०२/२०१० दि. २२/३/२०१० अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांना साकीनाका पो.ठाणे गु.र.क्र.३३५/०७ कलम४६५,५६७,४७१,४२०,३४ भा.द.वि.स. या गुन्हांची सद्यःस्थिती कळविण्याची विनंती करण्यात आली.

सदर पत्राच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई यांनी त्यांचे जा.क्र. २९१४/२०१० दि. २२/३/२०१० अन्वये कळविले आहे की, साकीनाका पो.ठाणे गु.र.क्र.३३५/०७ कलम ४६५,५६७,४७१,४२०,३४ भा.द.वि.स या गुन्हयाचे " क" समरीकरिता फिर्यादी श्री. नर्वदा प्रसाद मिश्रा यांना मा. न्यायालयाने बोलाविले असता फिर्यादी यांनी सदर गुन्हयाच्या " क" समरी मंजुरीकरीता आक्षेप घेतला. फिर्यादी (अर्ज दार )यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर पुन्हा तपास करण्याची विनती मा. न्यायालयास केल्याचे फिर्यादी यांनी विनती मान्य करुन मा. न्यायालयाने फौ.दं.प्र.सं.कलम १७३(८) अन्वये सदर गुन्हयाचा पुर्नतपास करण्याचे आदेश दिल्याने सदर गुन्हयाचे मुळ कागदपत्र साकीनाका पोलीस ठाणे येथे दि. १७/२/२०१० रोजी प्राप्त झाले असून मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु करण्यात आला आहे.

यास्तव अर्जदार श्री. नर्वंदा प्रसाद मिश्रा यांनी माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये मागितलेली माहिती (नोटींग) ही साकीनाका पो.ठाणे गु.र.क्र.३३५/०७ कलम ४६५,५६७,४७१, ४२०,३४ भा.द.वि.स या गुन्हयाशी संबंधित असल्याने सदर गुन्हयांचा तपास पूर्ण झाल्यानंतर अर्जदारास सदर टिप्पणीची (नोटींगची) प्रत देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. "

थोडक्यात तक्रारदारांविरुध्द जे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत त्याच्या चार्जशिट त्यांना मिळालेल्या आहेत. तसेच तक्रारदारांनी जी फिर्याद न्यायालयात दिलेली आहे त्यावर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार फेरचौकशी करावयाची आहे व ही फेरचौकशी झाल्यानंतर तक्रारदारांस हव्या

असलेल्या टिप्पणीची प्रत देण्यात येईल असे दि. २९/३/२०१० रोजीच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. न्यायालयाचा आदेश हा आयोगाने दिलेल्या आदेशानंतरचा आहे व त्यानुसार कारवाई पूर्ण झाल्यानंतर तक्रारदारांस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

*---आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ०७.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २६/१०**

**श्री. हरिहर पाटील -----अपीलार्थी**
**सरचिटणीस भारतीय कर्मचारी महासंघ**
**९६/३२४+३२७, धरणगांव,**
**जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी**
**धरणगांव नगरपरिषद, ता. धरणगांव,जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**धरणगांव नगरपरिषद कार्यालय,**
**ता. धरणगांव,जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २३/०६/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी श्री. हरिहर पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३/०६/२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६/१२/२००८ रोजी अर्ज करुन धरणगांव नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील सर्व विभागातील कर्मचा-यांची नैमित्तीक रजा सोडून कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अन्य सर्व प्रकारच्या रजाबाबतच्या हिशोबाची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १५/१/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून उपलब्ध होताच देण्यांत येईल. प्रत्यक्षात काही माहिती उपलब्ध झाली असून ती जन माहिती अधिकारी यांनी दि. २०/२/२००९ च्या पत्राद्वारे कळविले व उर्वरित माहिती उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल असे सांगितले.

प्रत्यक्षात विहित मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. परंतु दरम्यानच्या काळात प्रथम अपिलीय अधिकारी श्री. गायकवाड यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत कोणतेही आदेश पारित झाले नाहीत.

अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर राहिले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबी.---

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यास विहित मुदतीत तयारी दाखविली होती. या प्रकरणांत कर्मचा-यांची संख्या मोठया प्रमाणांत असल्याने काही माहिती दिली व उर्वरित माहिती नंतर देण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे त्यांनी दि. १८/३/२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार असून नगरपरिषदेतील अभिलेख विभागातून प्राप्त करुन घ्यावी व उर्वरित माहिती उपलब्धतेनुसार पुरविण्यांत येईल असे कळविले.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांची अन्य ठिकाणी बदली झाल्याने त्याच्या अनुपस्थितीमुळे प्रथम अपीलावर कोणतेही आदेश पारित झाले नाहीत.

३. जन माहिती अधिका-यांनी दि. ५/३/२०१० रोजी आयोगास लिहिलेल्या पत्रात अपीलार्थीस उपलब्धतेनुसार वेळोवेळी माहिती पुरविण्यांत आलेली आहे.

४. एकूण कर्मचा-यांची संख्या फार मोठया प्रमाणांत आढळून येते त्यामुळे प्रत्येक कर्मचा-याचे सेवापुस्तकांत नोंदणी घेणे, अर्जि/अर्धपगारी रजेची नोंद घेणे, उपभोगिलेली रजा वजा करणे हे काम विहित मुदतीत होणार नाही. याशिवाय जन माहिती अधिकारी यांना स्वतःचे काम सांभाळून हे काम करावे लागते.

मागितलेल्या माहितीचा विचार करता सदर माहिती विहित वेळेत होण्यासरखी दिसत नाही. तरीही जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी उपलब्धतेनुसार माहिती दिलेली आहे. प्रत्यक्षांत मुख्य सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. माहिती देण्यास विहित कालावधीपेक्षा जास्त वेळ लागला हे मान्य असले तरी अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: १५.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ६१/१०

श्री. रामचंद्र दत्तात्रय ब्रम्हे -----अपीलार्थी
रा. ब्रम्हेगल्ली, बालाजी मंदिराजवळ,
अमळनेर, ता.अमळनेर, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
भूमि अभिलेख जळगांव, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख अमळनेर, जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २१/१०/२००९
सुनावणीचा दिनांक ०३/०३/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. रामचंद्र दत्तात्रय ब्रम्हे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१/१०/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७/०६/२००९ रोजी अर्ज करुन अमळनेर येथील सि.स.नं.१४४४ (घर नं. १३३१) ची मिळकत सन १९२० पूर्वी कोणाचे नांवावर दाखल होती यासाठी जुन्या गावठाणाच्या ७/१२ ची नक्कलची मागणी केली होती.

अपीलार्थीकडे चौकशी रजिस्टर २९/७/१९२० ची नक्कल आहे. चौकशीच्या वेळी

सि.स.नं.१४४४ चे मिळकतीवर गोविंद रावजी ब्रम्हे यांचे नांव आहे तर १९२० पूर्वी ही मिळकत कोणाच्या नांवावर आहे हे दाखविणारा ७/१२ च्या उता-याची नक्कल त्यांना पाहिजे आहे.

सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की, अमळनेर येथील ग.नं. १३४७ व १३४७ चे गट स्कीमची नक्कल पुरविण्यात आली आहे. तसेच सि.स.नं. १४४४/१ व १४४४/२ चा प्रॉपर्टी उतारा अपीलार्थीस देऊ केला होता. पण तो त्यांना नको आहे. त्यामुळे रेकॉर्डला असलेली माहिती देण्याचा प्रयत्न निश्चितपणे केलेला दिसून येतो.

अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार मूळ सर्वे नं, त्यानंतरचे गट नं व सि.स.नं. यांची सांगड लागत नाही. त्यासंबंधात अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी त्यांच्या अमळनेर येथील पुढील व्हिजीटमध्ये ही बाब तपासून पाहत असल्याचे सुनावणीच्या वेळी सांगितले.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: १५.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ४५/१०

श्रीमती. सविता सुभाष पाटील (अहिरे) -----अपीलार्थी
मु. जारगांव, पो. सारोळा,
ता. पाचोरा, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी ----उत्तरवादी
पाचोरा, गिररोड, फळरोप वाटीका पाचोरा,
जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय,
पाचोरा, गिररोड, फळरोप वाटीका पाचोरा,
जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २१/०५/२००९
सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०

अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्रीमती. सविता सुभाष पाटील (अहिरे) यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१/०५/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७/०३/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. चौकशीसाठी श्री. अहिरे यांना पाचारण करणेसाठी उपविभागीय कृषि अधिकारी पाचोरा यांनी दिलेल्या पत्राची प्रत.

२. श्री. अहिरे यांनी दिलेला लेखी जबाब प्रत.

३. चौकशीसाठी न बोलाविता, लेखी जबाब न घेता चौकशी अहवाल पाठविला त्याची प्रत.

४. चौकशी केली त्यासंबंधीचे शासन निर्णय/परिपत्रक दस्ताची प्रत.

५. चौकशी न्यायतत्वाने झाली असल्याचे शासकीय निर्णय/नियम याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१/३/२००९ च्या पत्राद्वारे श्री. अहिरे, कृ.स.वरखेडी यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु असतांना किंवा त्याच कारणास्तव न्यायप्रविष्ठ प्रकरण सुरु असतांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ अन्वये माहिती देता येत नाही असे अपीलार्थीस वेळेत कळविले.

अपीलार्थीस ते मान्य न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३/५/२००९ च्या पत्राद्वारे अर्जासोबत प्रतिज्ञापत्र जोडलेले नाही. माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीची छायांकित प्रत जोडलेली नाही या कारणास्तव अपील अर्ज फेटाळण्यात आल्याचे अपीलार्थीस कळविण्यात आले. त्या विरोधात अपीलार्थीनी द्वितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते परंतु जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळेस निदर्शनास आलेल्या बाबी पुढीलप्रमाणे ---

१.अपिलीय अधिकारी यांनी अधिनियम २००५ मधील ८ च्या तरतुदीचा चुकीचा अर्थ लावून अर्ज फेटाळला आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, श्री अहिरे यांची विभागीय चौकशी सुरु असतांना किंवा त्याच कारणास्तव न्यायप्रविष्ठ प्रकरण सुरु असतांना त्या चौकशीस बाधा येण्याची शक्यता असल्याने अपील अर्ज फेटाळण्यात आला.

**एकंदरीत या प्रकरणात अपीलार्थीस माहिती दिल्यास न्यायप्रक्रियेत किंवा विभागीय चौकशीत अडथळा निर्माण होऊ नये हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः १५.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ३३/१०**

**श्री. मुरलीधर विठू सरोदे -----अपीलार्थी**
**मु.पो. आमोद, ता. यावल, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी ----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद जळगांव, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद (शिक्षण)**
**जळगांव, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २३/०६/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. मुरलीधर विठू सरोदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३/०६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/०७/२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.**

**१. यावल तालुक्यातील किती अनुदानित माध्यमिक शाळांनी आपणाकडून सेवाजेष्ठता यादी मंजूर करुन घेतलेली आहे व किती शाळांनी करुन घेतली नाही.**

**२. सदर मुद्दयावर मंजूर करुन घेतलेल्या अनुदानीत माध्यमिक शाळांची जेष्ठतासुची यादी मिळावी.**

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. उलट शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जळगांव यांनी अपीलार्थीस चुकीची माहिती दिलेली दिसून येते. अपीलार्थींनी माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५/५/२००९ च्या पत्राद्वारे अजन माहिती अधिकारी यांनी शाळेची माहिती देणे क्रमप्राप्त असतांना त्यांनी माहिती पुरविली नाही हे चूक असून दि.२५/५/२००९ रोजी ठेवलेल्या सुनावणीच्या वेळेस माहितीसह हजर व्हावे असे अपीलार्थीसह कळविले. अपीलार्थीस सुनावणीचे पत्र वेळेत न मिळाल्याने त्यांच्या गैरहजेरीत सुनावणी घेऊन अपीलार्थीस दि. २९/५/०९ च्या पत्राद्वारे काही माहिती पाठविण्यात आली.

शिक्षणाधिकारी जळगांव यांनी चुकीची माहिती दिल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थीस दि. २३/१०/२००९ रोजीच्या पत्राने माहिती दिली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्यास अपिलीय अधिका-यांनी पुष्टी दिली आहे. मात्र अपीलार्थींचे म्हणणे माहिती चुकीची आहे. पण ती चुकीची कशी याचे विश्लेषण अपीलात नाही. अशा परिस्थितीत अपीलार्थींनी हवे तर मूळ नस्तीची पाहणी करावी व रेकॉर्डप्रमाणेच माहिती दिली आहे याची खात्री करुन घ्यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: १५.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ५५/१०**

**श्री. वाल्मिकी अर्जुन माळी -----अपीलार्थी**
**मु.पो. पिलखोड, ता. चाळीसगांव,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक ----उत्तरवादी**
**माध्यमिक विद्यालय मोहान,**
**ता. जि. धुळे.**

**२. जन माहिती अधिकारी**
**माध्यमिक विद्यालय मोहान,**
**ता. जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १८/०५/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी श्री.वाल्मिकी अर्जुन माळी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८/०५/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५/११/२००८ रोजी अर्ज करुन शिक्षक हजेरी, पगार बील, माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी दि. २२/६/२००२ ते ३१/१/२००८ पर्यंतचे हजेरीपट, नेमणूकीचा आदेश, सेवासमाप्तीची ऑर्डर इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली असे नमूद केले आहे. अपीलार्थीनी माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी , जन

माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली असून ती त्यांना मिळाली म्हणून नमूद केले आहे.

अपीलार्थीनी व्यथित होऊन द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते. परंतु उत्तरवादी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळेस झालेल्या चर्चेदरम्यान अपीलार्थीनी यापूर्वीच विद्यालयाचे हजेरीपटाची प्रत बनावट दिली, ती खरी दिली नाही, हजेरीपट बदलून टाकले, नेमणूकमीचा आदेश दिला नाही, नोकरी नेमणूकीच्या आदेशावर खोटया सहया दुस-याकडून करुन घेतल्या असे जरी त्यांनी नमूद केले असले तरी सुनावणीस ते गैरहजर राहिल्यामुळे त्यांचे म्हणणे काय होते ते समजू शकले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती मूळ दस्तऐवजावरुन देण्यांत आली असे नमूद केले आहे.

तेव्हा आवश्यकता वाटल्यास अपीलार्थी मुळ कागदपत्रांची तपासणी करुन शहानिशा करुन घेऊ शकतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः १५.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४२/१०**

**श्री. नरेंद्र रमेश पाटील -----अपीलार्थी**
**रा. यशवंतनगर (भोईवाडा)**
**भडगांव, ता. भडगांव, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ----उत्तरवादी**
**पंचायत समिती भडगांव, ता. भडगांव, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**पंचायत समिती कार्यालय भडगांव,**
**ता. भडगांव, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २१/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थी श्री.नरेंद्र रमेश पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१/१०/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२/०६/२००९ रोजी खालील नमूद माहिती मागितली होती.**

**१. भडगांव तालुक्यात हंगामी वसतीगृहांची संख्या.**

**२. वसतीगृहातील विद्यार्थी संख्या व त्यावरील अनुदान खर्च, त्याचे वाटप पडताळणी याचा तपशील.**

**३. शैक्षणिक संस्था अंतर्गत अपंग युनिटची संख्या त्याची पडताळणी**

**४. शिक्षकांच्या मान्यतेसाठीची शिफारस इत्यादी माहिती मागितली होती.**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३/७/२००९ च्या पत्राद्वारे माहिती दिली. परंतु सदर माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणास्तव अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केले नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी द्वितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी असे तिघेही अनुपस्थित होते.

एकंदरीत या प्रकरणाची वस्तुस्थिती अशी आहे.

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कांही मुद्दयांवर माहिती दिली.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलाची कोणतीही दखल घेतली नाही.

३. इतक्या महत्वाच्या आयोगाच्या सुनावणीस तिघेही अनुपस्थित राहिले. त्यामुळे माहिती घेणारा व देणारे यांना परिस्थितीचे कोणतेच गांभिर्य वाटत नाही. अपीलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांना आणखी कोणती माहिती हवी होती त्याचा बोध होत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. ती पूर्ण देण्याची त्यांनी तसदी घेतली नाही व तसा प्रयत्न केलेला दिसत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तर या प्रकरणांत आपल कांही संबंध नाही असा पवित्रा घेतलेला दिसतो. त्यांना वरिष्ठांनी सोपविलेल्या जबाबदारीचे भान राहिलेले दिसत नाही. माहिती मागणा-या व्यक्त्तीस वारंवार खेपा घालावयास लावणे किंवा त्यांना त्रास होईल अशी कृती करणे अधिकारी वर्गाला अशोभनिय आहे. तरी त्यांनी यापुढे डोळसपणे कार्य करावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उर्वरित माहिती कोणत्याही परिस्थिती २० दिवसांत मोफत उपलब्ध करुन द्यावी व तसे आयोगास कळवावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाल्याची खात्री करावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: १५.४.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ७९/१०

श्री. देविदास लटकन सुतार -----अपीलार्थी
मु.पो. टाकरखेडा, ता. अमळनेर,
जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी ----उत्तरवादी
पंचायत समिती अमळनेर, ता. अमळनेर,
जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
पंचायत समिती कार्यालय टाकरखेडा,
अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३१/०८/२००९
सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०
अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री.देविदास लटकन सुतार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१/०८/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थीचे प्रतिनिधी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०९/०३/२००९ रोजी खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

१. व्यापारी संकुले कोणत्या योजनेअंतर्गत बांधली गेली.

२. बांधकाम करणारे ठेकेदार कोण.

३. बांधकामाचे इस्टीमेट

४. बांधकाम झाले त्या जागेचा ७/१२ चा उतारा.

५. किती शॉपींग बांधली व कोणत्या मापाची.

६. व्यापारी संकुलांचे वाटप कोणत्या नियमान्वये केले त्याची प्रती इत्यादी माहिती मागितली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २५/४/२००९ च्या पत्राद्वारे मुद्देनिहाय दिली आहे. ज्या नोंदी त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात सापडल्या नाहीत त्याची माहिती दिलेली नाही. माहिती उशिरा दिली आहे. परंतु अपूर्ण माहिती मिळाली म्हणून अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३/५/२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेश दिले. तरीही पूर्ण माहिती अपीलार्थीस न मिळाल्याने त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांचे प्रतिनिधी व उत्तरवादी असे तिघेही हजर होते. त्यावेळी निदर्शनास आलेल्या बाबी.---

१. जन माहिती अधिकारी यांनी माहिती पोष्टाने पाठविली असता अपीलार्थीनी स्वीकारली नाही.

२. प्रथम अपीलावर सुनावणी झाली त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपीलार्थीस पुरवावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिले.

३. अपीलार्थी यांचे म्हणणे माहिती अपूर्ण मिळाली. तीही उशिरा मिळाली. महत्वाच्या मुद्दयावरील माहिती नोंदी नाहीत कागदपत्रे उपलब्ध नाहीत या कारणास्तव नाकारण्यांत आली.

एंकंदरीत या प्रकरणी असे दिसते की, माहिती ८ वर्षापूर्वीची आहे. ती संकलीत करण्यास जन माहिती अधिकारी यांना वेळ लागला त्यामुळे ते विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत. त्यासाठी त्यांनी मुदतवाढ मागितली होती.

याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. उर्वरित माहिती कार्यालयीन अभिलेखात शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाही. परंतु प्रथम

**अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस माहिती द्यावी असे निर्देशित केले होते. परंतु तरीही माहिती दिलेली दिसत नाही. पूर्वी दिलेलीच माहिती दिली आहे असे सांगत आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त अर्जाशी संबंधित इतर माहिती रेकॉर्डला नाही याची खात्री करुन घ्यावी व अपीलार्थींनी सुध्दा हवे तर नस्तीचे अवलोकन करुन खात्री करुन घ्यावी.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक: १५.४.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४५/१०

श्री. कुरेशी शेख अगबर शेख लुकमान -----अपीलार्थी
रा. भोसले गल्ली, पारोळा,
ता. पारोळा, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ----उत्तरवादी
जिल्हा परिषद कार्यालय जळगांव,
जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
ॲग्लो उर्दु हायस्कूल पारोळा,
ता. पारोळा, जि. जळगांव.

*---विवेचन---*

श्री.कुरेशी शेख अकबर शेख लुकमान यांनी दि. ६/११/२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ॲग्लो उर्दु हायस्कूल पारोळा यांचेकडून श्री. शेख रफीक शेख मेहबूब यांचेशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली.

१. बी.एड मार्क शिट
२. बी.एस.सी मार्क शिट
३. पद मान्यतेच्या प्रती
४. सेवेत रुजू झाल्यापासून आजतागायत ज्या ज्या पदावर नियुक्ती केलेली आहे त्याच्या प्रती.
५. सेवापुस्तकांतील सर्व नोंदी
६. पे रजिस्टरच्या प्रती (सन १९९३- ९४ते आजतागायत )
७. संपूर्ण कर्मचा-यांच्या पे रजिस्टरच्या प्रती
८. मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करतेवेळी शिक्षण विभागाने दिलेले नाहरकत प्रमाणपत्र.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १५/७/२००९ रोजी उत्तर दिलेले असून ते समाधानकारक नसल्याने दि. ७/८/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद जळगांव यांचेकडे अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ३ दिवसांत माहिती द्यावी असे आदेश प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ७/९/२००९ रोजी दिलेले आहेत.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांनी केले नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ६/३/२०१० रोजी जळगांव येथे आयोजित करण्यात आली होती. त्यास फक्त अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी दाखल केलेले द्वितीय अपील व त्यासोबतची कागदपत्रे पाहता असे दिसते की, अपीलार्थीस जाणून बुजून माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती दिली नाही त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कारवाई करणे आयोगास तसे क्रमप्राप्तच होते. पण सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे नुकतेच निधन झाल्याची बाब अपिलीय अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली. त्यामुळे शास्तीचे आदेश नाहीत.

मात्र विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हे आदेश मिळताच ७ दिवसांचे आत माहिती द्यावी.

<u>*---आदेश---*</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: १६.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १४७/१०**

**श्री. श्रीकांत मधुकर भोईटे -----अपीलार्थी**
**शिवाजी नगर यावल,**
**मु.पो. यावल, ता.यावल, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी**
**नगर परिषद यावल, ता. यावल,**
**जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**कर वसुली विभाग, नगरपरिषद यावल,**
**ता. यावल, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ०८/०८/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थी श्री.श्रीकांत मधुकर भोईटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८/०८/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करीता अपीलार्थीचे प्रतिनिधी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८/०३/२००९ रोजी अर्ज करुन सन २००७-०८ व २००८-०९ या वर्षात यावल नगरपरिषदेचे नगरसेवक यांचेकडून घरपट्टी, टपरी भाडे, गाळा भाडे, जागा भाडे, शॉपींग सेंटर इत्यादि थकबाकी पोटी नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १५१ अनुसार शेकडा १०% नोटीस फी आकारणी का करण्यात आली नाही याचा खुलासा मागितला होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती लिखित वा तोंडी दिलेली नाही त्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. ८/७/२००९ रोजी सुनावणी

घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थीनी ३ दिवसांत माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तोंडी युक्तीवाद केला की, अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने देता येत नाही. तर अपीलार्थी यांनी सर्व नगरसेवकांना नोटीस लावण्याबाबत योग्य पुरावे जोडण्याचे मान्य केले. पुरावा सादर केल्यानंतर माहिती पुरविण्यांत यावी असे नमूद करुन अपिलीय अधिकारी यांनी अपील अंशतः मान्य केले.

अपीलार्थीस माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी असे तिघेही गैरहजर राहिले.

अपीलार्थी यांनी यापूर्वीही दोन अपीले दाखल केली आहेत व हे धरुन ते तिन्ही द्वितीय अपीलांच्या सुनावणीस अनुपस्थित राहिलेले आढळून आले. कमीत कमी आपण कां अनुपस्थित राहणार याची कारणे तरी आयोगास कळवावी त्याचा आयोग विचार करु शकेल.

अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यासमोर प्रथम अपील सुनावणीच्या वेळी नोटीसा व पुरावे जोडून फेर अर्ज सादर करण्याचे मान्य केले होते ते त्यांनी केलेले नाही त्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती "खुलासे" या सदरांतील असल्याने ती फेटाळण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे उचित वाटते.

मात्र अपीलार्थीस हवे असेल तर संबंधित प्रकरणांची नस्ती अपीलार्थीस दाखविण्यात यावी व त्यांतील कागदपत्रांच्या प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: १६.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ११९/१०

श्री. प्रेमचंद रुपचंद सुरवाडे -----अपीलार्थी
रा. खंडाळा, ता. भुसावळ, जि.जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ----उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय पाचोरा,
जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय पाचोरा,
जि. जळगांव.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १७/११/२००९
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. ३/८/२००९ च्या अर्जाद्वारे आत्मा विस्तार योजनेतील शेती शाळा, ग्राम बिजोत्पादन व गतीमान याविषयी सन २००८ ते २००९ या काळातील माहितीची मागणी केली. यावर उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १०/९/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आयोगास सादर केले की, अपीलार्थींना द्यावयाची संपूर्ण माहिती तयार आहे व ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. यावर आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार सर्व माहिती विनाशुल्क तात्काळ पुरविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १६.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १२४/१०**

**श्री.संतोष गोवर्धन पाटील -----अपीलार्थी**
**मु. सावळखेडे, पो. आडगांव,**
**ता. पारोळा, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं) ----उत्तरवादी**
**पंचायत समिती पारोळा, जि. जळगांव.**
**२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळखेडे, ता. पारोळा, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ०८/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. १७/६/२००९ च्या अर्जान्वये ग्रामपंचायत अंतर्गत जो शिवकालीन बंधारा बांधण्यात आला होता त्यावरील खर्चाच्या सर्व बिलांच्या फोटो कॉपी मागितल्या होत्या. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १७/९/२००९च्या पत्रान्वये अपीलार्थींना पुरविली. दरम्यानच्या काळात अपीलार्थींनी दि. २४/७/२००९ रोजी प्रथम अपील केले. तद्नंतर आपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आयोगास असे सादर केले की, अपीलार्थींना हवी असलेली माहिती ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे असल्यामुळे त्यांच्या कडून माहिती प्राप्त करुन ती अपीलार्थीस पुरविण्यात वेळ गेला. तथापि आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच अपीलार्थींना हवी असेली माहिती सुध्दा त्यांना देण्यात आली आहे. व अपीलार्थींनी ती मिळाली असल्याचे सांगितले. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: १६.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ६०/१०**

**श्री. विवेक नारायण पाटील -----अपीलार्थी**
**राजे संभाजी चौक, बाहेरपुरा,**
**अमळनेर, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ----उत्तरवादी**
**भडगांव कृषि कार्यालय, भडगांव, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**भडगांव तालुका कृषि अधिकारी कार्यालय,**
**भडगांव, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २२/०९/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. विवेक नारायण पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२/०९/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६/०५/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.**

१. भडगांव तालुका कृषि खात्याअंतर्गत तालुक्यात मृद संधारणाची कामे चालू असून आतापर्यंत किती कामे पूर्ण झाली व किती बाकी व अपूरी आहेत.

२. किती कामांचे बील अदा करण्यांत आले त्याचे गांव शिवार, कामाचे प्रकार, कोणत्या मंडळामध्ये किती कामे झाली व कोणत्या योजनेत झाली त्या खर्चाचा तपशील इत्यादी

माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. या कारणास्तव अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी. ---

१. अपीलार्थीनी जरी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करुनहि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती दिल्या नाहीत शिवाय त्यांच्या मागणीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

२. अपीलार्थीस मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास झाला त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

एकूण या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध होती. परंतु त्यांनी बुध्दीपुरस्सर नकला दिलेल्या नाहीत किंवा त्यांना माहिती देणे अडचणीचे वाटत असावे. त्यामुळे त्यांनी ती देण्यास टाळाटाळ केलेली दिसते. त्यांच्या या वर्तणूकीवरुन ते माहिती देण्याच्या मन:स्थितीत नाहीत. या सर्व प्रकरणाचा सारासार विचार करता जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार रु. ५,०००/- शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या जून २०१० या महिन्याच्या वेतनातून वसूल करण्यात यावी. वसूलीची रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास चलनाच्या प्रतीसह १५ जून, २०१० पर्यंत अवगत करावा.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शास्ती वसूलीची  वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.  तसेच अपीलार्थीस १५ दिवसांत विनामूल्य माहिती देण्याच्या कार्यवाहीची अमलबजावणी करावी.

***----आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १७.४.२०१०
राज्य  मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ७१/१०**

**श्री. ॲड्. किरण सुर्यकांत शिरसाठे -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. ४४३/१९ब आदर्शनगर,**
**जळगांव, ता.जि. जळगांव - ४२५ ००१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**तहसिल कार्यालय रावेर,**
**ता. रावेर, जिल्हा जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**तहसिल कार्यालय रावेर,**
**ता. रावेर, जिल्हा जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २७/०७/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी उपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थी श्री. ॲड् किरण सुर्यकांत शिरसाठे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७/०७/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी उपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३/०३/२००९ रोजी सोनी कॉम्प्यूटर जळगांव यांनी रावेर तालुक्यातील करारानुसार /निविदेनुसार रावेर तालुक्यातील एकूण ११६ महसूली

गावांचे गा.न.नं. ७/१२ च्या संगणकीकृत डेटा अद्यावतीकरणाचे काम १ मे २००५ ते ३० सप्टेंबर २००५ या कालावधीत पूर्ण केलेले आहे त्यासंबंधीचा संपूर्ण तपशील. तसेच दिलेल्या रक्कमेचा तपशील धनादेश/डिमांड ड्राफ्ट सह देण्यात यावा. तसेच करारनाम्याची प्रमाणित प्रत इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/३/२००९ च्या पत्राद्वारे कार्यालयांत उपलब्ध नसलेली माहिती पुरविता येत नाही असे अपीलार्थीस कळवून अपील दप्तरी दाखल केले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांची चुक लक्षात आल्यानंतर त्यांनी तो अर्ज दि. २५/९/२००९ च्या पत्राद्वारे उपजिल्हाधिकारी (महसूल विभाग) जळगांव येथे हस्तांतरित केला व तसे अपीलार्थीस कळविले. माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४/५/२००९ व दि. ३०/५/२००९ रोजी सुनावणी ठेवली त्यावेळी दि. ३०/५/२००९ रोजीच्या सुनावणीस अपीलार्थी हजर होते. त्यांनी अर्ज प्रथम माहिती न देता निकाली काढला तर नंतर चुकीची दुरुस्ती म्हणून अधिनियमाच्या कलम ६(३) खाली योग्य त्या प्राधिका-याकडे हस्तांतरित केला त्यामुळे माहिती मिळाली नाही. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी चूक मान्य करुन परत अर्ज हस्तांतरित करण्याच्या सूचना दिल्या.

अपीलार्थीस एवढे करुनही माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी हजर होते परंतु उत्तरवादी दोन्ही अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी नजरेस आलेली वस्तुस्थिती --

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींचा अर्ज अधिनियमाच्या कलम ६ (३)(ii) प्रमाणे संबंधित विभागाकडे ५ दिवसांत अर्ज हस्तांतरित करावयास हवा होता तो त्यांनी निकाली काढून दप्तरीदाखल केला.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही जन माहिती अधिकारी यांनी केलेली चुक दुरुस्त करुन तो अर्ज हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.

३. दि. १४/१०/२००५ च्या तहसिलदार रावेर यांच्या प्रमाणपत्रानुसार सोनी कॉम्प्यूटर जळगांव यांनी संगणीकृत डेटा अद्यावतीकरणाचे काम वेळेत पूर्ण केलेले आहे यावरुन सदरची माहिती कार्यालयांत उपलब्ध आहे. परंतु ती जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे टाळलेले दिसते.

तरी कामात कुचराई करणे, चुकीचे निर्णय घेणे, उडवाउडवीची उत्तरे देणे, अर्ज संबंधित अधिका-यांकडे पाठविण्यास विलंब लावणे पर्यायाने माहिती मिळण्यास विलंब लावणे या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांच्या जुन २०१० महिन्यात होणाऱ्या वेतनातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल चलनाच्या प्रतीसह आयोगास २५ जुन, २०१० पर्यंत अवगत करावा.

*---आदेश----*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १५ दिवसांत विनामूल्य माहिती पुरवावी.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शास्ती वसुलीची कार्यवाही पार पाडावी. तसेच अपीलार्थीस माहिती मिळाली की नाही याची खात्री करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः १७.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६८०१/अपील क्रमांक ५६१०/०२

श्री. प्रेम प्रसाद -----अपीलार्थी
११०६, सनडयू, रहेजा विहार,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०७२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
(इ.व.का) डब्ल्यू एस-१,
मुंबई महानगरपालिका कार्यालय, १ ला मजला,
आर.एल. पाटकर मार्ग, बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०.

२. जन माहिती अधिकारी
उप कार्यकारी अभियंता कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका , १ ला मजला,
आर.एल. पाटकर मार्ग, बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २४/१/२०१०
सुनावणीची तारीख १९/४/२०१०
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस सनडयू हौसिंग सोसायटी , चांदिवली अंधेरी (पूर्व) मुंबई ७२ या इमारतीच्या बांधकामाच्या परवानगीविषयी कमेन्समेंट प्लिंथ, ऑक्युपेशन सर्टिफिकेट, ॲनेक्चर १, फायर ब्रिगेडने दिलेली एन.ओ.सी. याबाबतीत माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस सदरील नस्तीचे अवलोकन करण्यास बोलाविण्यात आले होते. तर प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या आदेशात अपीलार्थींनी विचारलेली माहिती ही प्रश्नोत्तर स्वरुपात असल्यामुळे देता येणार नाही असे निर्देश दिले होते त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीबरोबर चर्चा करुन त्यांना कोणती कागदपत्रे दिली तर त्यांच्या माहितीची गरज पूर्ण होऊ शकेल यासंबंधी चर्चा करण्यात आली व त्या अनुषंगाने पुढील कागदपत्रे अपीलार्थीस विनामूल्य देण्याचे आदेश देण्यांत आले.

१. सदरील बांधकाम प्रस्तावाची नोटींग साईडची संपूर्ण प्रत.

२. इंटिमेशन ऑफ ॲप्रूव्हल/ डिसॲप्रूव्हल, कमिंसमेंट ऑक्युपन्सी सर्टिफिकेट.

३. फायर ब्रिगेडने दिलेली एन.ओ.सी. ची प्रत

वरील सर्व कागदपत्रे अपीलार्थीस विनामूल्य १० दिवसांचे आंत देण्यांत यावीत.

जन माहिती अधिकारी सुनावणीच्या वेळेस उपस्थित कां राहिले नाहीत याचा खुलासा त्यांनी आयोगास दि. १० मे, २०१० पर्यंत पाठवावा.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः १९.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५७६२/अपील क्रमांक ५६१२/०२

श्रीमती. डॉ. सुशिला बलदवा व इतर -----अपीलार्थी
बी-१०२, सुमेर नगर, कोरा केंद्र बस स्टॉप समोर,
एस.व्ही. रोड, बोरीवली (पश्चिम) मुंबई ४०० ०९२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय
१ ला मजला, एम.एम.आर.डी.ए इमारत,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
मुद्रांक जिल्हाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय
१ ला मजला, एम.एम.आर.डी.ए इमारत,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ०९/१२/२००९
सुनावणीची तारीख १९/४/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जाबाबत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले.

" पक्षकार डॉ. श्रीमती. सुशिला महेश बलदवा यांनी अभय योजना २००८ च्या अंतर्गत दि. ०६/१०/२००८ रोजी या कार्यालयात अभय योजना २००८ च्या अंतर्गत मुळ दस्त (COB/AY/U-1/4215/2008) दाखल केले होते. सदर दस्तावर मुल्यांकनाची कार्यवाही दि. ०३/१२/२००८ रोजी पूर्ण करुन पक्षकारास दि. ३१/१२/२००८ रोजी मुद्रांक शुल्क रु. ४७,९५०/- व दंड रु. १०००/- भरण्याकरीता मागणी पत्र देण्यात आले होते. सदर मागणीपत्राच्या अनुषंगाने पक्षकाराने कोणताही आक्षेप न घेता दि. २२/०१/२००९ रोजी मुद्रांक शुल्क व दंडाचा भरणा केला.

तदवत मुद्रांक शुल्क व दंडाचा भरणा केल्यानंतर दि. १७/०९/२००९ रोजी मुळ दस्त प्रमाणित करुन पक्षकारास वितरीत करण्यात आले. "

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थीला माहिती पेक्षा त्यांच्यावर जे जास्त मुद्रांक शुल्क आकारण्यात आले त्याबाबत रिफंड पाहिजे आहे. याबाबतीत रिफंड देण्याचे अधिकार मुद्रांक जिल्हाधिका-यांना नसल्यामुळे सदर प्रकरणी इन्स्पेक्टर जनरल रजिस्ट्रेशन यांच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अशा पध्दतीची कार्यवाही मान्य आहे असे अपीलार्थी यांनी सांगितले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: १९.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३०४/०२**

**श्री.डॉ. एस. पी. झवर -----अपीलार्थी**
**कविता अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६,**
**पहिला मजला, स्वामी समर्थ मंदिराजवळ,**
**आदर्श नगर, जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त ----उत्तरवादी**
**राज्य कामगार विमा योजना (आरोग्य खाते)कार्यालय,**
**परेल, मुंबई ४०० ०१३.**

**२. जन माहिती अधिकारी तथा संचालक (प्रशासन)**
**राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**परेल, मुंबई ४०० ०१३.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ७/०२/२००९**
**सुनावणीचा दिनांक २७/११/२००९ जळगांव येथे व दि. १९/४/२०१० मुंबई येथे.**

**अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार शासनाचे दि. १३ जुलै १९८२ नुसार पदोन्नती संदर्भात मानीव दिनांक मिळणेबाबत व केलेली कार्यवाही, दि. १५/२/२००७ पासून वेळोवेळी स्मरणपत्र पाठवून देखिल आजपावेतो माहिती पुरविण्यात आली नाही.**

**सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थींचा मानीव दिनांक बदलून देण्यासंबंधीचा अर्ज राज्य शासनाने अमान्य केला आहे व तसे त्यांना १९८४ व १९९० साली कळविण्यात आलेले आहे. त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात सुध्दा त्यांनी मॅट कडे केलेले अपील हे मॅटने फेटाळून लावलेले आहे. व हायकोर्टाने सुध्दा मॅटचा हा निर्णय कायम केलेला आहे.**

**अपीलार्थींची मानीव दिनांकाची विनंती अव्हेरल्यानंतर ते पुन्हा पुन्हा अर्ज करीत राहिले व आता मानीव दिनांकासंबंधी कुठचाहि पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही असेहि त्यांना**

**कळविण्यांत आलेले आहे. अपीलार्थीस यासंबंधी दि. १३/४/२०१० रोजी पत्र पाठवून सविस्तर कळविलेले आहे. तसेच अपीलार्थींच्या प्रकरणातील ५६५ पृष्ठांची नस्तीही अपीलार्थीस अवलोकनासाठी केव्हाही उपलब्ध आहे व नस्ती पाहून जे कागदपत्र मागतील ती त्यांना देण्याची तयारी विभागाने दर्शविलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश---***

**अपील फेटाळण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः १९.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४६००/अपील क्रमांक ५६१३/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४४६०१/अपील क्रमांक ५६१४/०२**

**श्री. निसार वाघू -----अपीलार्थी**
**आशियाना अपार्टमेंट, २ रा मजला,**
**हुसेन पटेल मार्ग, माझगांव, मुंबई १०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा विश्वस्त ----उत्तरवादी**
**सुनत जमात , नरियलवाडी मास्क आणि कब्रस्तान ट्रस्ट,**
**६९, संत सावता मार्ग, लो लेवल,**
**नरियलवाडी, मुंबई ४०० ०१०.**

**२. जन माहिती अधिकारी**
**सुनत जमात , नरियलवाडी मास्क आणि कब्रस्तान ट्रस्ट,**
**६९, संत सावता मार्ग, लो लेवल,**
**नरियलवाडी, मुंबई ४०० ०१०.**

***---विवेचन---***

**अपीलार्थीस सुनत जमात , नरियलवाडी मास्क आणि कब्रस्तान ट्रस्ट, यांच्याकडून कांही माहिती पाहिजे होती. मात्र त्यांना कुठचाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**सुनावणीच्या वेळेला सुध्दा ट्रस्टतर्फे कोणीही उपस्थित नव्हते.**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने ट्रस्ट या संस्था "सार्वजनिक प्राधिकरणे" नाहीत त्यामुळे त्याना माहिती देणे बंधनकारक करता येणार नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे.**

**अपीलार्थींना ट्रस्ट कडून माहिती पाहिजे असल्यास व वरिल निर्णयानुसार त्या ट्रस्टला माहिती**

**देण्याचे निर्देश जरी आयोगास देता येत नसेले तरी  अपीलार्थीस त्या ट्रस्टच्या कामकाजाविषयी कांही तक्रार असल्यास ते निश्चितपणे धर्मादाय आयुक्तांकडे करु शकतात असे सुचविण्यात आले.**

***----आदेश----***

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: १९.४.२०१०** **राज्य  मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६३८३/अपील क्रमांक ५६१५/०२

श्रीमती. मंजू उपाध्याय -----अपीलार्थी
इव्हन्होई बिल्डींग, ४ था मजला,
फ्लॅट नं. १०, जगन्नाथ भोसले मार्ग,
मुंबई ४०० ०२१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सचिव ----उत्तरवादी
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा
२ रा मजला, हायकोर्ट एक्सटेन्शन,
फोर्ट, मुंबई ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा
२ रा मजला, हायकोर्ट एक्सटेन्शन,
फोर्ट, मुंबई ४०० ०१२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ८ जानेवारी, २०१०.
सुनावणीची तारीख १९/४/२०१०
अपीलार्थी उपस्थित जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. २७/८/२००९ रोजीच्या अर्जानुसार ॲड् महेश एस.जानी यांनी सनद मिळण्यासाठी केलेल्या अर्जावरील सहया या झेरॉक्स सर्टिफाईड कॉपीच्या स्वरुपात मिळण्याची विनंती केली होती.

दि. २५ सप्टेंबर, २००९ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी ॲड् महेश एस.जानी यांच्या सहयांच्या प्रमाणित प्रती देता येणार नाही असे कळविले. त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

**संबंधित ॲड् महेश एस. जानी यांनी सनद मिळण्यासाठी जो अर्ज दिला होता त्याची प्रमाणित प्रत मिळाली तर चालेल कां असेल विचारले असता त्यांनी होकारार्थी उत्तर दिले. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना संबंधित ॲड्व्होकेटनी सनद मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत द्यावी.**

***----आदेश----***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक: १९.४.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६६२३/अपील क्रमांक ५५९७/०२

श्री.निलेश गुप्ता -----अपीलार्थी
फ्लॅट नं. २३, ए विंग, नालंदा सोसायटी,
६२, गोपाळदास देशमुख मार्ग, पेडर रोड,
मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ५५९७ मध्ये दि. २६/२/२०१० रोजीच्या आदेशात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनहि अपीलार्थीस माहिती दिलेली नाही म्हणून शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना दि. १९/४/२०१० रोजी आयोगाच्या कार्यालयात बोलाविण्यात आले होते.

सुनावणीच्या वेळेस दिलेल्या खुलाश्यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गांवदेवी पोलीस ठाणे, मुंबई यांना दि. २०/११/२००९ न्वये माहिती पाठविण्यासाठी लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले होते. मात्र सदर माहिती ही दि. १२/४/२०१० रोजी प्राप्त झाली. त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी अपीलार्थी यांना वेळोवेळी दिलेल्या माहितीची सर्व कागदपत्रे व निवेदन सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केलेले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी जे निवेदन सादर केले आहे त्यानुसार त्यांनी अपीलार्थीस याअगोदर वेळोवेळी माहिती दिलेली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. उदा दि. १२ जुलै, २००७, १३/२/२००८, १४/१/२००९, २१/५/२००९ व ६/७/२००९ रोजी पत्र लिहून वेळोवेळी माहिती / अपीलार्थीच्या पत्रास उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माहिती हेतूपुरस्सर द्यावयाची नाही असा

प्रमाद त्यांच्या हातून घडलेला दिसून येत नाही. त्याच त्याच मुद्दयांची पुनरावृत्ती होत असल्यामुळे सदरील अहवाल पाठविण्यास वेळ लागला आहे याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे व पुन्हा अशी चूक घडणार नाही असे आयोगास सांगितले. त्यामुळे शास्तीचे आदेश नाहीत.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती १० दिवसांचे आत देण्यात यावी असे निर्देश याअगोदरच दिलेले आहेत त्याचे पालन त्वरित करावे.

***---आदेशङ्ग***

शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: १९.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६४०५/अपील क्रमांक ५५९२/०२**

**श्री. विजय दिनकर पवार** **-----अपीलार्थी**
**सार्वजनिक बांधकाम कार्यालयाजवळ,**
**शिवडी फास्ट ट्रॅक समोर, झकेरिया बंदर रोड,**
**शिवडी, मुंबई ४०० ०१५.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी** **----उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)**
**मुंबई ४०० ०५१.**

**२. जन माहिती अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)**
**मुंबई ४०० ०५१.**

***---विवेचन---***

अपील क्र. ५५९२ मध्ये दि. २६/२/२००९ रोजी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनहि अपीलार्थीस माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा आयोगापुढे दि. १९/४/२०१० रोजी सादर करण्यात यावा असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून आयोगाला खुलासा सादर केलेला आहे.

अपीलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ याविषयी माहिती अगोदरच अपीलार्थीस देण्यांत आली होती. मात्र मुद्दा क्र. १ व ४ ची माहिती ही सहकारी गृहनिर्माण संस्था पातळीवरची असल्यामुळे अपीलार्थीस ही माहिती देण्याचे संस्थेस कळविले होते. मात्र संस्थेने अपीलार्थीस माहिती दिली नाही किंवा जन माहिती अधिका-यांकडे सुध्दा देण्यासाठी ती माहिती पाठविली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, या संस्थेवर आता प्रशासकाची नेमणूक झ ालेली आहे. तेव्हा प्रशासकाने रेकॉर्डचा कसोशिने शोध घेऊन अपीलार्थीस हवी असणारी माहिती

**१५ दिवसांच्या आत अपीलार्थीस देण्याची कारवाई करावी. जर रेकॉर्डमध्ये कागदपत्रे उपलब्ध होत नसतील तर त्याप्रमाणे अपीलार्थीस प्रथम कळवावे व रेकॉर्ड गहाळ करणा-याविरुध्द सहकार कायद्यान्वये कारवाई करावी. या आदेशाची प्रत अंमलबजावणी होण्यासाठी जन माहिति अधिकारी यांनी संस्थेच्या प्रशासकाना रवाना करण्याची व्यवस्था करावी.**

***---आदेश---***

**शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः १९.४.२०१०**

**राज्य मुख्य माहिति आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६४००/अपील क्रमांक ५५९१/०२

श्री. सुनिल मुलचंद विश्वकर्मा -----अपीलार्थी
प्लॉट नं. ८९, खेरवाडी,
वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त एच/पूर्व ,
१३७, टीपीएस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का)
सहायक मनपा आयुक्त एच/पूर्व ,
१३७, टीपीएस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

*---विवेचन---*

अपील क्र. ५५९१ मध्ये दि. २६/२/२००९ रोजी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनहि अपीलार्थीस माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा आयोगापुढे दि. १९/४/२०१० रोजी सादर करण्यात यावा असे निर्देश दिले होते. तरी सुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिलेले नाहीत.

अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार त्यांना अजूनहि माहिती मिळालेली नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १० दिवसांच्या आत सर्व माहिती द्यावी. वेळेत माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती जन माहिती अधिकारी यांच्या १ जून, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली शासकीय तिजोरीत जमा करावी. व तसे केल्याचा अहवाल दि. १५ जून, २०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

**शास्ती वसूली जबाबदारी अपिलीय अधिकारी यांचेवर टाकण्यात येत आहे. तसेच अपीलार्थीस माहिती मिळवून देण्याची जबाबदारी सुध्दा अपिलीय अधिकारी यांनी पार पाडावी.**

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट निर्देशाची कार्यवाही व अंमलबजावणी करावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: १९.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६३८६/अपील क्रमांक ५५७२/०२

श्री. के. एल. तारीहलकर -----अपीलार्थी
फ्लॅट नं अ/४, सेंन्ट्रल एक्साईज ऑफिसर्स क्वार्टर,
मीठ चौकी, मार्वे रोड, मालाड (पश्चिम) मुंबई ६४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक (पणन) ----उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (पणन)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ८/१/२०१०
सुनावणीची तारीख १९/४/२०१०
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. ९/९/२००९ रोजीच्या पत्रानुसार सिमाभागातून महाराष्ट्रात आलेल्या नागरिकांसाठी गाळा वितरणाच्या पात्रतेच्या अटी व सवलतीसंबंधी माहिती पाहिजे होती.

अपीलार्थींच्या अर्जास व प्रथम अपीलास कुठचाहि प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी उत्तरवादी अनुपस्थित होते.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती ५ दिवसांच्या आत देण्यांत यावी. तसेच माहिती देण्यांस झालेल्या विलंबाबद्दल आपल्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का

करण्यांत येऊ नये याचा लेखी खुलासा आयोगास दि १३ मे, २०१० रोजी सायंकाळी ५-०० वाजता प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून सादर करावा.

***----आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः १९.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १३२४/०२**

**श्री.सुभाष नागो माळी -----अपीलार्थी**
**मु.पो. शिंदखेडा, ता. शिंदखेडा,**
**जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा ग्राम विस्तार अधिकारी ----उत्तरवादी**
**पंचायत समिती शिंदखेडा, जि. धुळे.**

**२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**ग्रामपंचातय शिंदखेडा, जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १७/०६/२००९**
**सुनावणीचा दिनांक ७/१२/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींना दि. ४/३/२००९ च्या अर्जाद्वारे ग्रामपंचायती अंतर्गत सन २००८-०९ मध्ये ग्रामनिधी अंतर्गत केलेल्या कामाचे विवरण, अंदाजपत्रक, झालेला खर्च, कामांचे मुल्यांकन इत्यादि माहितीची मागणी केली.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ७/५/२००९ रोजी प्रथम अपील केले. अपील मान्य करण्यात येऊन व दि. २५/५/२००९ रोजीच्या आदेशान्वये अपीलार्थींना कळविण्यात आले. माहिती अप्राप्त असल्याने अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादीतर्फे सादर करण्यात आले की, तत्कालीन ग्रामसेवक यांनी कार्यभार हस्तांतर केलेला नसल्याने अपीलार्थींना माहिती देता आली नाही. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, विद्यमान ग्रामविकास अधिकारी यांनी कागदपत्रे हस्तगत करुन अपीलार्थींना माहिती विनामुल्य पुरवावी. याबाबत आयोगाचे असेहि निदेश आहेत की, मुख्य

**कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांनी कागदपत्रे हस्तांतरण न करण्याबाबत तत्कालीन ग्रामविस्तार अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी.**

***----आदेश----***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**सदर आदेशाची प्रत उपरनिर्दिष्ट कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांना देण्यात यावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः २०.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५८/१०

श्री.नागसेन राजाराम सुरळकर -----अपीलार्थी
मु.पो. नाडगांव (दादानगर)
ता. बोदवड, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
(ग्रामपंचायत) जिल्हा परिषद जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)यांचे कार्यालय,
जिल्हा परिषद जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २४/०८/२००९
सुनावणीचा दिनांक ६/०३/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ११/५/२००९ च्या अर्जाद्वारे जिल्हा परिषदेच्या कामकाजाबाबत एकूण १६ मुद्दयांबाबत माहिती मागितली. यामध्ये ज्या बाबींचा समावेश होता त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे.

१. दि. १/४/१९९९ ते ३१/३/२००९ पर्यंत निलंबित ग्रामसेवकांची यादी
२. निलंबित ग्रामसेवकांची जातीनिहाय वर्गवारी
३. ज्यांची आयुक्तांमार्फत विभागीय चौकशी करण्यात आली त्यांची यादी
४. परत कामावर घेतलेल्या ग्रामसेवकांच्या नावाची यादी
५. ज्यांची जिल्हा परिषद स्तरावर चौकशी करण्यात आली त्यांची यादी.
६. चौकशीचे आदेश किती दिवसात देण्यात आले याचा तपशील
७. विकास निधी खर्च न केलेल्या ग्रामपंचायतीची यादी
८. निलंबनाचे एकूण प्रस्ताव किती
९. निलंबित ग्रामसेवकांना चौकशीविना कामावर परत घेतले असल्यास त्याबाबतच्या आदेशाच्या प्रती.

१०. चौकशी ज्या शासन निर्णयानुसार प्रस्तावित केली त्याची प्रत
११. ग्रामसेवकांना ज्या कारणास्तव निलंबित केले त्याचा तपशील
१२. पदावनत केलेल्या ग्रामविकास अधिका-यांची यादी,
१३. कामात दिरंगाई केल्याबाबत कारवाई प्रस्तावित केलेल्या कर्मचा-यांची यादी
१४. ग्रामसेवकाला बडतर्फ केल्यावर पुन्हा सेवेत घेतले असल्यास त्याबाबतच्या शासन निर्णयाच्या प्रती
१५. बडतर्फ कर्मचा-याला सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असलेल्या अधिकार व कर्तव्याबाबतच्या प्रती.
१६. निलंबनानंतर ३० दिवसांच्या आत परत कामावर घेतलेल्या ग्रामसेवकांची यादी.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १७/६/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. १०/८/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. दरम्यानच्या काळात अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली. तथापि पुरविलेल्या माहितीची सत्यता पडताळता येत नाही व मुदतीत माहिती दिली नाही ही कारणे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी सादर केले की, अपीलार्थींना माहिती पुरविली आहे. अपीलार्थींच्या कथनानुसार माहिती अपूर्ण आहे. अपीलार्थींनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती संकलित करतांना काही त्रुटी राहिल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही असे आयोगाला वाटते. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. निरीक्षणासाठी दिनांक व वेळ निश्चित करुन अपीलार्थींना पुरेसा अवधी राहिल या बेताने कळविण्यात यावे. अपीलार्थींनी नियोजित दिवशी व वेळी समक्ष कार्यालयात जाऊन कागदपत्रे बघावी व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती विहित शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त कराव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २०.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५००/०२**

**श्री. ॲड् सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी**
**श्री. नरेंद्र मधुकर लचके**
**एन ४१, जे.ए. ३- १२-१**
**सावतानगर, सिडको-४, नवीन सिडको,**
**नाशिक ४२२ ७०८.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी**
**कृष्णा खोरे विकास महामंडळ, कोरेगांव रोड,**
**कृष्णा नगर, सातारा, जि. सातारा.**

**२. जन माहिती अधिकारी**
**कृष्णा खोरे महामंडळ सातारा यांचे कार्यालय,**
**सातारा.**

***---विवेचन---***

**अपील/सीआर क्रमांक १५००/०२ च्या दि. ३०/३/२०१० रोजीच्या आदेशात आयोगाने उत्तरवादी सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्याबद्दल खुलासा मागविण्यात आला होता. तसेच अपीलार्थीस त्यांच्या अर्जाची माहिती देण्यासंबंधीही निर्देश देण्यांत आले होते.**

**अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचा खुलासा बघता असे दिसून येते की, अपीलार्थीनी त्यांच्या मुळ माहिती अर्जात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे जे पत्ते लिहिले होते ते पत्ते बरोबर नसल्यामुळे अपीलार्थीचा अर्ज व अपील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिका-यांपर्यंत पोचला नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती मिळू शकली नाही व प्रथम अपीलावर सुनावणी होऊ शकली नाही.**

**उत्तरवादी यांनी दिलेल्या खुलाश्यात स्पष्ट केलेले आहे की, या दोन्ही अधिका-यांनी अपीलार्थीच्या इतर ३ अर्जांच्या संबंधी माहिती दिलेली आहे. यावरुन अपीलार्थीच्या अर्जाला**

हेतूपुरस्सर प्रतिसाद दिला नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. याकरिता उत्तरवादी यांचे खालील नमूद पत्त्यांवर अपीलार्थींनी पुन्हा अर्ज पाठवावा व त्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांमध्ये अपीलार्थीस माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे पत्ते पुढीलप्रमाणे -

जन माहिती अधिकारी - श्री. वा.कृ.लांभाते
सहायक अधीक्षक अभियंता
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा
कृष्णानगर, सिंचन भवन, पीन कोड ४१५ ००३.

प्रथम अपिलीय अधिकारी - श्री. कि. भा. कुलकर्णी
अधीक्षक अभियंता
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा
कृष्णानगर, सिंचन भवन, पीन कोड ४१५ ००३.

***---आदेश---***

शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २०.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३५१६५/अपील क्रमांक ३६८७/०२

श्री. मजिद अ. उमरभॉय -----अपीलार्थी
नरिमन इमारत, ६ वा मजला,
फ्लॅट नं १२अ, १६२ , एम.के. रोड, मुंबई.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक ----उत्तरवादी
उच्च न्यायालय, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

श्री. मजिद अ. उमरभॉय यांनी दि. १८ जुलै, २००८ अन्वये जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील कोर्ट रिसिव्हर रिपोर्ट क्र.८२/२००७ सोबत कंप्लायन्स रिपोर्ट नं. २६१/२००७ सूट नं. ६७१/२००२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात आले आहे काय १ तसेच कोर्ट रिसिव्हर यांनी कोणत्या Contractor ची नांवे वगळलेली आहेत याची देखिल माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३/७/२००८ च्या पत्रान्वये त्यांनी दाखल केलेला माहितीचा अर्ज उच्च न्यायालय, मुंबई यांचे माहितीचा अधिकार नियम २००६ मधील तरतुदीनुसार पूर्ण नाही. तसेच कोर्ट फी स्टॅम्पही अपुरे आहेत.

मुंबई उच्च न्यायालय, माहितीचा अधिकार नियम २००६ मधील नियम ९ व १९ मधील तरतुदीनुसार न्यायीक प्रक्रिया व त्यासंबंधीचे अभिलेख (Judicial Proceedings or records ) उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. सदर आदेशाविरुध्द अपीलार्थीनी प्रथम

अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे वतीने जन माहिती अधिकारी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या माहितीच्या नियमानुसार अपील दाखल करावे व सदर नियमातील नियम ९ व १९ नुसार न्यायिक प्रक्रिसंदर्भातील माहिती देता येणार नाही असे कळविलेले आहे. त्यामुळै त्यांनी प्रथम अपील कोणत्या Ground चा आधार घेऊन केलेले आहे त्याचा बोध होत नाही. तेव्हा त्यांना त्यांचे प्रथम अपीलामध्ये सुधारणा करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली होती. सदर मुदतीत त्यांनी सुधारणा न केल्यास त्यांचे प्रथम अपील महाप्रबंधक यांचेसमोर ठेवून उचित आदेश पारित करण्यात येतील असे देखिल कळविलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने जन माहिती अधिकारी यांनी दि. २४/११/०८ रोजी अपीलार्थीनी non compliance of office objeetion असे कारण देवून अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेऐवजी जन माहिती अधिकारी यांनी निर्णय दिला असे नमुद माहिती देण्याची विनंती अपीलार्थीनी त्यांच्या दि. १/९/०८ च्या द्वितीय अपीलात केली आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. ७/२/२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलासोबतची कागदपत्रे व सुनावणीवेळी सादर केलेली कागदपत्रे पाहता मी या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपीलार्थीस संधी देऊनहि उच्च न्यायालयाच्या पत्राच्या अनुषंगाने (non compliance of office objeetion ) पूर्तता केली नाही. त्यामुळे अपीलार्थींचे अपील फेटाळण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील फेटाळण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २१.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १५०१/०२**

**श्री. ॲड् सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी**
**श्री. नरेंद्र मधुकर लचके**
**एन ४१, जे.ए. ३- १२-१**
**सावतानगर, सिडको-४, नवीन सिडको,**
**नाशिक ४२२ ७०८.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारनेर,**
**ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २३/३/२००९**
**सुनावणीचा दिनांक २१/१२/२००९**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थींनी दि. २३/८/२००८ च्या अर्जान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पारनेर उपविभागाशी संबंधित विविध मुद्दयांवर माहिती मागितली.

माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. १०/१०/२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दि. १४/११/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार अपीलार्थींनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क लवकरात लवकर द्यावयाची होती. तथापि अपीलार्थींना माहिती मिळाली नाही. या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश असतांना सुध्दा त्यांना माहिती मिळालेली नाही. उत्तरवादी अनुपस्थित असल्याने त्यांची बाजू आयोगाला जाणून घेता आली नाही. अपीलावरील सुनावणीसाठी उत्तरवादींनी गैरहजर राहणे ही गंभीर बाब आहे. तरी आयोगाचे त्यांना निदेश आहेत की, त्यांनी त्यांच्या गैरहजेरीबाबतचा खुलासा आयोगास १५ दिवसांच्या आत सादर करावा.

अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती पुरवावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रत उपरोक्त निर्देशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांना देण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २२/४/२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्रमांक ५४०/०१

श्री.रुपचंद लौगाणी -----तक्रारदार
६, फाऊंटन हेड सोसायटी,
१३३/एस.व्ही.रोड, खार, मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ९, हिल रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०.

*---विवेचन---*

श्रीयुत रुपचंद लौंगाणी यांनी त्यांच्या दि. २२ सप्टेंबर, २००९ रोजीच्या पत्राने आयोगाने त्यांचे अपील क्र २८६४/०२ मध्ये दि. २७ नाव्हेंबर, २००८ रोजीच्या आदेशात कलम ५३(१) अन्वये कारवाई असे नमूद केले असतांना एम.आर.टी.पी. च्या कलम ५३(८) अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे अशी तक्रार केलेली आहे.

माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्या कलमाखाली कारवाई करावी हे आयोग सुचवित नसते. आयोगाच्या दि. २७ नाव्हेंबर,२००८ रोजीच्या आदेशात महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्टच्या कलम ५३(१) चा उल्लेख आहे तो तक्रारदारांनी कलम ५३(१) प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे अशी माहिती मागितली होती असा तो उल्लेख आहे.

चौकशीअंती जर संबंधित अधिकारी दुसरे कलम वापरत असेल तर अमुकच कलमाखाली कारवाई करा असा आदेश देण्याचा अधिकार आयोगाकडे नाही. कागदपत्रे जशी असतील तशी मिळवून देण्याची जबाबदारी ही आयोगाची असते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*-----आदेश---*

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २६.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २८/१०

श्री. सतिष बळीराम चव्हाण -----अपीलार्थी

मु.पो. कानळदा, ता.जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ----उत्तरवादी
पंचायत समिती जळगांव, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कानळदा, ता.जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ९/०२/२०१०
सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री.सतिष बळीराम चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९/०२/२०१० रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ६/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/०७/२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. आतापर्यंत झालेल्या /न झालेल्या तहकूब ग्रामसभांचे सूचना पत्र
२. दोन ग्रामपंचायतीमधील अंतर तीन महिन्यापेक्षा जास्त असलेल्या सभांची माहिती
३. ग्रामसभेच्या अध्यक्षाबद्दल
४. ग्रामसभेबाबतचा अजेंडा जिल्हा परिषद पदाधिका-यांना दिला आहे काय१
५. तहकूब सभाबद्दल

६. वर्षनिहाय ग्रामनिधी स्वरुप खर्च झाला त्यांचे दस्तऐवज

७. ग्रामविकास निधीबाबत वर्षनिहाय दस्तऐवज

८. ग्रामपंचायतीचे वर्षनिहाय बॅाक स्टेटमेंट इत्यादी.

मागितलेली माहिती मुद्देनिहाय व विस्तृत स्वरुपाची असल्याने व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी मुदत मिळावी अशी विनंती केली. प्रत्यक्षांत मुदतवाढ मिळूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलावरही प्रथत अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाहीत म्हणून व्यथित होऊन अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती -

१. जन माहिती अधिक्ारी यांनी मुदतवाढ घेऊनहि कोणतीही माहिती अपीलार्थी्रस शेवटपर्यंत दिलेली नाही.

२. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणताही आदेश पारित केला नाही.

३. दोन्ही अधिका-यांनी कामात टाळाटाळ केलेली दिसून येते.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी ओळखून काम करणे आवश्यक आहे. अपीलार्थीना टोळवाटोळवी करुन त्रास देणे योग्य नाही. माहिती विस्तृत स्वरुपाची असली तरी १० महिने होऊन गेले तरी अपीलार्थीस एकाहि मुद्दयाची माहिती मिळालेली नाही. अशा प्रकारे बेजबाबदारपणे काम करणे शासनास अपेक्षित नाही. ज्या कामासाठी आपली नेमणूक केली आहे ते काम प्रामाणिकपणे करणे प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. तरी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १० दिवसांत सर्व माहिती मोफत पुरवावी व तसे आयोगास अवगत करावे.

माहिती वेळेत न दिल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम ही जन माहिती अधिकारी यांच्या १ जून २०१० व जुलै २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसूल करुन शासनाने

विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल चलनाच्या प्रतीसह १ जुलै, २०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी यापुढे आपली जबाबदारी ओळखून आपल्याकडे आलेल्या प्रथम अपीलाची विहित मुदतीत सुनावणी घेऊन त्यावर आदेश पारित करावेत अशी समज देण्यात येत आहे. तसेच वरील शास्ती वसूलीची कार्यवाही जबाबदारपणे पार पाडावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २६.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६२०/१०**

**श्री. लक्ष्मण रामचंद्र गव्हाणे -----अपीलार्थी**
**मु.पो. कांचनगांव, पो. खैरगांव,**
**ता. इगतपुरी, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी ----उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि. नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, जि.नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १६/०९/२००९**
**सुनावणीचा दिनांक २२/०१२/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. ६/५/२००९ च्या अर्जान्वये सन १९९४ ते एप्रिल २००९ पर्यंतच्या कालावधीची इगतपुरी तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचाच्या आरक्षणाबाबतची माहिती मागितली.**

**उपरोक्त माहिती दि. ५/६/२००९ रोजीच्या पत्रान्वये अव्वर कारकून, ग्रामपंचायत शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी त्यांना पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १९/६/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादीनी आयोगास सादर केले की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महिला आरक्षण काढल्या जाते व त्याबाबत अपीलार्थींना सर्व माहिती पुरविली आहे. महिला आरक्षण सोडून इतर सर्व आरक्षण तहसिल कार्यालयाकडून काढले जाते.**

तेव्हा याबाबत त्यांनी  तहसिल कार्यालयाकडून माहिती घ्यावी असे अपीलार्थींना दि. ५/६/२००९ रोजी कळविले आहे.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी हजर नसल्याने त्यांचे म्हणणे आयोगास जाणून घेता आले नाही.  सुनावणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे बघता आयोगाचे असे मत आहे की, अपीलार्थींना जिल्हाधिकारी कार्यालयाकडील माहिती पुरविण्यात आली आहे.  जी माहिती तहसिल कार्यालयात आहे ती देण्यासाठी अर्जाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाने स्वतःच तहसिलदार कार्यालयाकडे पाठवावयास पाहिजे होती याची नोंद जन माहिती अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय यांनी घ्यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.४.२०१०

राज्य  मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६३८१/अपील क्रमांक ५६४२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६३८२/अपील क्रमांक ५६४३/०२

श्री.डॉ. प्रकाश श्रीचंद खटवाणी -----अपीलार्थी
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,
निवासस्थान टाईप IV/७, एम.आय.डी.सी.,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा आयुक्त ----उत्तरवादी
राज्य कामगार विमा योजना कार्यालय,
महात्मा गांधी रुग्णालय, ३ रा मजला,
डॉ. एस.एस.राव रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी
राज्य कामगार विमा योजना कार्यालय,
महात्मा गांधी रुग्णालय, ३ रा मजला,
डॉ. एस.एस.राव रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

*---विवेचन---*

या दोन्ही अपीलांच्या सुनावणीचेवेळी अपीलार्थी जे राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी आहे ते अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीची बदली झाली असता ते बदलीच्या ठिकाणी उपस्थित झाले नाहीत त्यामुळे त्यांचा पगार देण्यात आलेला नाही यासंबंधी त्यांनी अनेक विषयावर माहिती मागितली होती.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीच्या वेगवेगळया मुद्दयांबाबत त्यांना आता माहिती देण्यांत आलेली आहे. त्यांच्या विनापरवानगी गैरहजेरीबद्दलच्या वेतनाच्या निर्णयाच्या बाबतीत शासनाकडून आदेश मागविलेले आहेत. अपीलार्थीस हवी असणारी माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून येते.

*----आदेश---*

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३०.४.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६३९९/अपील क्रमांक ५६४१/०२

श्री. शेख अमजद अली नूर हूसेन (बाबूल) -----अपीलार्थी
प्लॉट नं. २७/ए/४७, रोड नं.२,
शिवाजी नगर, मुंबई - ४०० ०४३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, सर जे.जे. मार्ग ,
नागपाडा, मुंबई ४०० ००८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई ४०० ००८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ७/१/२०१०
सुनावणीची तारीख ३०/४/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस पोलीस ठाणे संदर्भ क्र. एलअेसी नं. ३३११/९५ अन्वये बांगलादेशी नागरिक म्हणून अटक करण्यात आली होती त्यामध्ये न्यायालयाने जोपर्यंत परदेशी नागरिक आहेत असे सिध्द होत नाही तोपर्यंत त्यांना देशातून बाहेर काढू नये असा मनाई हुकुम पारित केलेला आहे. वरील आदेशाच्या संदर्भात पोलीस काय कारवाई करीत आहेत याची माहिती अपीलार्थींना पाहिजे आहे.

पोलीस स्टेशनच्या म्हणण्यानुसार यासंबंधात कुठचीही कागदपत्रे सापडून येत नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती देता येत नाही.

एखादयाचे नागरिकत्वाविषयीची संशयास्पदता ही गंभिर बाब मानायला पाहिजे व त्यासंदर्भात सिव्हील कोर्टाचे आदेश झाल्यानंतर त्याप्रकरणी काय कारवाई करायची याबाबत कागदपत्रेच नाहीत म्हणून पोलीस स्टेशन अनभिज्ञ दिसते. संबंधित पोलीस ठाण्याने कांहीच

**कारवाई केलेली नाही ही बाब संबंधित उप पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांच्या निदर्शनास आणण्यात यावी व त्यांनी याबाबतीत योग्यती कारवाई करावी.**

**कारवाईच्या संदर्भात अंतिमतः प्राप्त झाल्यानंतर कारवाईच्या संदर्भात अपीलार्थीस माहिती अधिकाराच्या तरतुदीच्या अधिन राहून कळविण्यात यावी.**

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**पोलीस उपआयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांकः ३०.४.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६४०६/अपील क्रमांक ५६४४/०२

क्रमांक-मु.मा.आ/४६४०७/अपील क्रमांक ५६४५/०२

श्री.रामशंकर सरोज -----अपीलार्थी

घन:शामदास चाळ, रुम नं २,
संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,
धारावी, मुंबई ४०० ०१७

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ३, मध्य नियंत्रण कक्ष,
बावळा कंपाऊंड, भायखळा (पूर्व) मुंबई २७

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
परिमंडळ ३, मध्य नियंत्रण कक्ष,
बावळा कंपाऊंड, भायखळा (पूर्व) मुंबई २७

***---विवेचन---***

अपीलांचे दिनांक ४/१/२०१०
सुनावणीची तारीख ३०/४/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व सर्व कागदपत्रांचे वाचन केल्यानंतर असे दिसून आले की, अपीलार्थीस हवी असणारी सर्व माहिती देण्यात आलेली आहे. फक्त अमुक व्यक्तीविरुध्द कारवाई का करण्यात आलेली नाही वगैरे सारखे खुलासे मात्र देण्यात आलेले नाहीत व खुलासे देणे हे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत सुध्दा नाही.

अपीलार्थींच्या अनुक अर्जांना मुद्देसुद माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे असेच आयोगास दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३०.४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ४४/१०**

**श्री. नगराज जनार्दन पाटील -----अपीलार्थी**
**१८२, भिकमचंद जैन नगर,**
**जळगांव, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनरक्षक ----उत्तरवादी**
**रोजगार हमी योजना वनविभाग, जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा वर क्षेत्रपाल**
**वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग एरंडोल,**
**जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ३०/०६/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थी श्री.नगराज जनार्दन पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०/०६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५/०३/२००९ रोजी अर्ज करुन प्रथम गुन्हा रिपोर्ट व फौजदारी दाव्याची सन २००७ ते २००९ ची माहिती मागितली होती.**

**जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २०/४/२००९ च्या पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणांत एकूण ५ वनगुन्हे कामासंबंधी असून मा.जे.एम.एफ.सी वर्ग १ धरणगांव यांचे न्यायालयांत दि. २२/२३-९-**

०८ रोजी आरोपपत्र दाखल करण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकरणातील मूळ कागदपत्रे कोर्टात दाखल करण्यात आली आहेत.

माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३/५/२००९ रोजी सुनावणी घेतली. अपीलार्थी व जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत अपीलार्थीस माहिती न देण्याचे कारण सांगण्यांत आले व सारासार विचारांती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती न देण्याचे दिलेले उत्तर योग्य असल्याचे आदेश अपिलीय अधिकारी यांनी पारित केले. त्याविरोधात अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते, जन माहिती अधिकारी रजेवर होते.

एकूण प्रकरणांत अपीलार्थींनी मागणी केलेल्या १. प्रथम गुन्हा रिपोर्ट व फौजदारी दाव्या संबंधीची मूळ कागदपत्रे न्यायालयात दाखल केली असल्याने ते प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

त्यामुळे अपीलार्थींनी मागितलेली माहिती न देण्याची जन माहिती अधिकारी यांची कारणमिमांसा योग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३०.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १६१६/०२

श्री. रईस अहमद मोहमंद शबीर ----अपीलार्थी
रा. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त ----उत्तरवादी
जानकी प्लाझा, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव
अे.टी.टी मालेगांव, १५०३, इस्मामपुरा,
मालेगांव, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३१/१०/२००८
सुनावणीचा दिनांक २२/१२/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

*---विवेचन---*

अपीलार्थी यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केलेली आहे ती संस्था माहितीचा अधिकार कायद्यानुसार शासकीय प्राधिकरण नाही. कारण अशा प्रकारच्या संस्थेस माहितीचा अधिकार कायदा लागू नसल्याचे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये निर्णय दिलेला आहे. मात्र संस्थेकडे शाळेच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असते उदा. नेमणूका, प्रशासकीय बाबी, शिस्तभंगाची कारवाई वगैरे ती संस्थेने सर्व शाळेमध्ये उपलब्ध करुन ठेवावी म्हणजे अर्जदारांना ती शाळेचे मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळविता येईल.

*---आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ३०.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १२६/१०**

**श्री. तुळशीराम धोंडू पाटील -----अपीलार्थी**
**मु.पो. पाळथी, ता. जामनेर,**
**जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक ----उत्तरवादी**
**भूमि अभिलेख जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी**
**तालुका निरीक्षकभूमि अभिलेख जामनेर,**
**ता. जामनेर, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २३/११/२००९**
**सुनावणीचा दिनांक ०६/०३/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी श्री तुळशीराम धोंडू पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६/११/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. ६/३/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९/०६/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. दि. २३/१/२००९ , दि. ३/९/२००९ व दि. २९/५/२००९ रोजी परिरक्षण भूमापक ,पहूर ता. जामनेर यांचेकडे अर्ज देऊन सिटी सर्व्हे नं. ४७७,४७८,व ४८८ च्या मिळकत पत्रिकेचे उतारे व नकाशाची मागणी करुन फी घेऊन अद्याप पावत्या अथवा पावत्यांची नक्कल न देण्याबाबत माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीनी मागितलेल्या मिळकत पत्रिकेचे उतारे व नकलांच्या प्रती मिळण्यासाठी फी घेतली. परंतु त्यांना वेगळयाच नांवाच्या पावत्या दिल्या त्याविरोधात अपीलार्थीनी दि. ३/८/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतलेली आढळून आलेली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी दि. २३/११/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर राहिले, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

द्वितीय सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी--

१. अपीलार्थी हे ८३ वर्षाचे वयस्कर गृहस्थ आहेत त्यामुळे ते गैरहजर राहिले असावेत.

२. अपीलार्थींकडून फी घेऊन प्रॉपर्टी कार्डच्या नकला दिल्या व नकाशाची नक्कल दिली परंतु पावत्या दिल्या त्या अपीलार्थींच्या नांवाच्या नसून दुस-याच व्यक्तीच्या असून त्यात खाडाखोड केलेली आहे. त्यामुळे अपीलार्थीस फी चा अपहार झाल्याचा संशय वाटतो.

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही कोणतेही आदेश पारित केलेले आढळून आलेले नाही.

अपीलार्थींकडून फी घेऊन त्यांना पावती न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा हेतू संशयास्पद वाटतो. अपीलार्थी वयस्कर असल्यामुळे ते वारंवार प्रत्यक्ष कार्यालयात जाऊ शकत नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही यावर काही भाष्य केलेले आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असून सुनावणीच्या वेळी नमूद केले असले तरी तसे प्रत्यक्षात अपीलार्थीस त्यांच्या नांवाने फी भरल्याच्या पावत्या मिळालेल्या नाहीत. ते न देण्याचे कारण समजू शकले नाही. आणि त्याचा समाधानकारक खुलासाहि केलेला नाही.

याबाबत जमाबंदी आयुक्त, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर, पुणे यांनी चौकशी करावी व योग्य ती कारवाई करावी.

अपीलार्थीस त्यांनी फी भरल्याच्या त्यांच्या नांवाच्या पावत्या १५ दिवसांत द्याव्यात.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत जमाबंदी आयुक्त, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर, पुणे यांना कार्यवाहीसाठी देण्यांत यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३०.४.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२७/०२**

**श्री. काळु रामदास पाटील, ------- अपीलकर्ता**
**मु.दगडी सबगव्हाण, पो.राजवड व्हाया धरणगांव,**
**ता.पारोळा,जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद, जळगांव**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद पारोळा,**
**मु.पो.ता.पारोळा,जि.जळगांव.**

**सुधारित आदेश.**

सदर अपीलामध्ये दिनांक २९/३/२०१० रोजी आयोगाने आदेश पारित केलेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात यावीच. शिवाय अपीलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जात मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश मिळताच १० दिवसांचे आंत द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिल्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :- तक्रार २००९/ ४५४२७/त.क्र.७०६/०७/का १**

**श्री. प्रा.के.डी.गावंड, ------ तक्रारकर्ता**
**अधिव्याखाता, वस्त्रनिर्माण विभाग,**
**व्ही.जे.टी.आय., माटुंगा,**
**मुंबई - ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी**
**व्ही.जे.टी.आय.महाविद्यालय, माटुंगा, मुंबई १९**

**जन माहिती अधिकारी**
**व्ही.जे.टी.आय.महाविद्यालय, माटुंगा, मुंबई १९**

**- वि वे च न -**

दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजीच्या पत्राने श्रीयुत के.डी.गावंड यांनी त्यांना माहिती न मिळाल्याची तक्रार केली होती. यासंदर्भात २२ मार्च, २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना नोटीस काढण्यात आली व त्यांचे म्हणने दिनांक ५.०४.२०१० रोजी एकूण घेण्यात आले त्या वेळेला तक्रारकर्ते उपस्थित होते. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की दिनांक ४.०२.२०१० रोजी अर्जदारास त्यांना हवी असणारी ३३२७ पृष्ठांची माहिती देण्यात आलेली आहे. माहिती फार विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती देण्यास उशीर लागेल, तक्रारकर्त्याचे असे म्हणणे आहे की त्यांना माहिती मिळालेली आहे फक्त डिसेंबर २००९ महिन्यात झालेल्या मिटींगचे कार्यवृत्त त्यांना मिळालेले नाही. हे कार्यवृत्तही जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे मान्य केले.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :- तक्रार २००९/ १३०/त.क्र.७०७/०७/का १**

**श्री. एस. के.नानगीया,** **------ तक्रारकर्ता**
**७०४, गोल्डन चॅरिएट, को.ऑप.हौ.सोसायटी,**
**१३३, सेक्टर ६,चारकोप कांदिवली (प),**
**मुंबई - ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**प्रबंधक, मुंबई विद्यापीठ, मुंबई**

**जन माहिती अधिकारी**
**परीक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, मुंबई**

**- वि वे च न -**

तक्रारकर्ते श्रीयुत एस.के.नानगीया यांनी आयोगाकडे दिनांक २५ जानेवारी, २०१० रोजी अधिनियम कलम १८ (१) अन्वये अर्ज दिला. त्यात त्यांनी असे नमूद केले की दिनांक ७.०८.२००९ रोजी त्यांनी मुंबई विद्यापीठाकडे विद्यापीठाचा निकाल जाहीर करण्यास होत असलेल्या उशिराबद्दल माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. पण त्यास कुठचाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.१०.२०१० रोजी प्रथम अपील सादर केले. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. मात्र ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली अर्जदारास कुठचाही प्रतिसाद पुढे प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना पत्र लिहीले होते, पण त्यालाही कुठचाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे पुढील तक्रार केलेली आहे.

१) त्यांना अजुनही माहिती मिळाली नाही. २) प्रथम अपीलाची सुनावणी होऊन त्यावर निर्णय झ ालेला नाही आणि अपिला व्यतिरिक्त आणखीन दुसरी दोन अपील दिनांक ७.१०.२००९ व ४.११.२००९ या रोजी दाखल केली त्यावर अजुनही निर्णय झालेला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विरुध्द प्रशासकीय चौकशी करण्याचे निर्देश देण्यात यावेत व माहिती मुदतीत न दिल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीचे आदेश देण्यात यावेत.

वरील सुनावणी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१० रोजी ठेवली होती त्या वेळेला प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. मात्र त्यांची अनुपस्थितीचे कारण दर्शविणारे पत्र पाठविले होते या दरम्यानच्या काळात २४ डिसेंबर, २००९ रोजीच्या मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार कुलसचिव जे अपिलीय अधिकारी या अगोदर होते त्यांच्या ऐवजी परीक्षा विभागाकरिता परिक्षक नियंत्रक यांची प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

प्रशासकीय बाबी लक्षात घेता अशा आदेशाचा आक्षेप घेता येणार नाही, मात्र ज्या जन माहिती अधिकाऱ्यांच्या आदेशाविरुध्द प्रथम अपील दाखल करण्यात आलेले आहे असे जन माहिती अधिकारी त्या विवक्षित अपीलाच्या बाबतीत साहजिकच प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने काम करु शकणार नाही. याची दखल विद्यापीठाने घेऊन अशा अपीलांच्या बाबतीत कुलसचिव किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशी अपील ऐकण्याचे निर्देश पारित करणे आवश्यक आहे.

तक्रारीची नंतरची सुनावणी दिनांक ५.०४.२०१० रोजी घेण्यात आली त्यावेळेला प्रभारी कुलसचिव, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सहाय्यक कुलसचिव व अपीलार्थी उपस्थित होते.

१) परीक्षा नियंत्रक विभागाने आयोगास ५ एप्रिल, २०१० रोजी असे निवेदन दिले की अर्जदाराचा मुळ अर्ज हा हया विभागास प्राप्तच न झाल्यामुळे त्या विषयीची माहिती त्यांच्या विभागाकडून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशी जरी परिस्थिती होती तरी ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेलाच तत्कालीन अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणने आवश्यक होते. अर्जदाराकडे मुळ अर्ज दिनांक ७.०८.२०१० रोजी विद्यापीठात प्राप्त झाल्याची पोचपावती आहे त्यामुळे कुलसचिव यांना असे निर्देश देण्यात आले की हा अर्ज कोठे आहे याचा शोध घेऊन कोणत्याही परिस्थितीत संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १२ जून, २०१० पर्यंत अर्जदारास माहिती देण्याची व्यवस्था करावी.

२) अर्जदारास माहिती मिळाली नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता हया अर्जावर मुदतीत माहिती न देण्यास जे कोण जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द तात्काळ चौकशी करावी. विद्यापीठ ज्या कोणास जबाबदार ठरवेल त्यांच्याकडून रुपये १०,०००/- ची शास्ती वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करण्याची कार्यवाही ही दिनांक १० जून २०१० पुर्वी पुर्ण करावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास दिनांक २० जून, २०१० पर्यंत पाठविण्यात यावा.

अर्जदाराची मुख्य तक्रार ही प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ३० दिवसात किंवा अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात संपुर्णपणे अपयशी ठरत आलेले होते. म्हणून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची शिफारशीस विद्यापीठास करण्यात यावी. या अगोदरही अनेक प्रकरणामध्ये तत्कालीन कुलसचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना आयोगास प्रथम अपीलाची सुनावणी वेळेत घेऊन त्यांचा निर्णय देण्यासंबंधी निर्देश दिलेले आहे. असे होऊन सुध्दा प्रथम अपीलावर निर्णय देण्यात सुधारणा झालेली नाही तेव्हा त्यांच्याकडून अपीलावरील निर्णय मुदतीत देण्याच्या बाबतीत सातत्याने झालेली हयगय लक्षात घेता आयोग विद्यापीठास याबाबतीत तत्कालीन कुलसचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करुन त्यांच्यावर योग्य प्रकारे कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

उपरिनिर्दिष्ट विवेचनात दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करुन घेण्याचे निर्देश प्रभारी कुलसचिव यांना देण्यात येत आहे त्यांनी याबाबतचा आपला अहवाल आयोगास दिनांक २० जून, २०१० पुर्वी सादर करावा. आवश्यक तेथे त्यांनी कुलगुरे यांचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ५.०४.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ६४ /०२**

**श्रीमती कमल काशिनाथ लोखंडे,** **------- अपीलकर्ता**
**जिल्हा परिषद केंद्रशाळा उसोदा,**
**ता.जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विस्तार अधिकारी पंचायत समिती जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २१.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्रीमती कमल काशिनाथ लोखंडे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) असोदा बीट शि.वि अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२००९ ला केलेला चौकशी अहवाल याची प्रत २) असोदा बीट यांना चौकशी करण्यासाठी दिलेली आदेशाची प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी त्यांना मुदतीत माहिती न मिळाल्याने व मिळालेली माहिती अपूर्ण असल्याच्या कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश पारीत केले ते समजू शकले नाही. परंतु अपीलार्थीने मागितलेली माहिती समाधानकारक नसल्याने त्यांनी व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांना दिलेली माहिती अपूर्ण होती, समाधानकारक नव्हती असे त्यांचे म्हणणे होते परंतु त्या सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांना किती प्रमाणांत माहिती मिळाली व कोणती माहिती मिळू शकली नाही याचा कोणताच उलगडा होऊ शकला नाही.

त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना अर्जदाराने प्रत्यक्ष भेटावे व त्याच दिवशी उर्वरीत माहिती त्यांनी अर्जदारांना द्यावी.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मुख्य सुनावणीस गैरहजर राहून आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नाही तरी यापुढे असे प्रकार घडल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ६३ /०२**

**श्री.सुधाकर महासेन राजाराम, ------- अपीलकर्ता**
**मुपो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय इगतपुरी,**
**जि. नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**पंचायत समिती कार्यालय इगतपुरी,**
**जि. नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १६.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.सुधाकर महासेन राजाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) ग्रामपंचायत घोटी येथील कार्यालयांतील सन २००५-सन २००९ पर्यंतच्या केलेल्या ग्रामपंचायतीच्या व गावाची विकास कामाचा आढावा माहिती २) विविध योजनेतून केलेली कामे उदा. स.ग्रा. रोजगार योजना ३) योजनेवरील खर्च ४) मजुरांच्या हजेरी पटाची प्रत ५) प्रोसिडिंग बुकाच्या सत्यप्रती ६) मजुरांना मजूरी वाटप इत्यादि माहिती मागितलेली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०६.२००९ च्या पत्राव्दारे मुद्या क्र.१ ते ४ दत्यंभूत माहिती घोटी ग्रामपंचायत कार्यालयांत उपलब्ध आहे ती टपालाव्दारे पाठविण्यांस छायांकित प्रतीसह रु. २७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. हा खर्च ग्रामपंचायतीस करावा लगणार आहे. परंतु ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात अशा खर्चाची तरतूद नाही तरी अपीलार्थीने प्रत्यक्षात येऊन माहितीचे अवलोकन करावे असे कळविले.

माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ७.०९.२००९ रोजी सुनावणी ठेवली त्यावेळी झालेल्या चर्चे दरम्यान अपीलार्थीस माहिती उपलब्ध असून त्यांची पाहणी करण्यासाठी योग्य ती तारीख जन माहिती अधिकारी व अपीलार्थीने ठरवावी ते मान्य झाल्यावर अर्ज निकाली काढण्यांत आला परंतु अपीलार्थीस माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावेळीच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते तर जन माहिती अधिकारी रजेवर होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहितीच्या छायांकित प्रतीचा खर्च रु. २७,५००/- अपेक्षित आहे तो ग्रामपंचायतीस करावा लागेल परंतु ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात अशी तरतूद नाही. २) अपालार्थी यांनी दारिद्रय रेषेखालील असल्याचा पुरावा सादर केल्याचे आढळून आलेला नाही. ३) माहिती उपलब्ध अल्याने ती प्रत्यक्षात कार्यालयांत येऊन त्याचे अवलोकन करावे कारण मागितलेली माहिती ही विविध मुद्यांवर आहे हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे.

माहिती उपलब्ध असून ती जन माहिती अधिकारी अपीलार्थीस कार्यालयात येऊन माहिती पाहू शकतात आणि अपीलार्थी माहिती मिळत नाही म्हणून अपील करतात हे असमर्थनीय आहे. त्यांनी योग्यती तारीख जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन ठरवावी व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस स्वत: हजर राहून कार्यालयीन दप्तरातील माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही त्याची जबाबदारी पार पाडावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ६६ /०२**

**श्री.कुलवंतसिंग भगतसिंग गुजराल,** **------- अपीलकर्ता**
**रा.गुजराल व्हीला टिंबर मार्केट,**
**भुसावळ, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अधिक्षक अभियंता, महाराष्ट राज्य विद्युत वितरण कं.लि.,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता, (श व ग्रा), महाराष्ट राज्य विद्युत वितरण कं.लि.,**
**चोपडे बिल्डिंग तापी नगर, भुसावळ, जि. जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०२.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.कुलवंतसिंग भगतसिंग गुजराल, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०१.२००७ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) सिरीज मीटर क्रं. ९०००१०२०७१ या नंबरच्या मीटरमध्ये बिघाड झाल्याने याचे मीटरच्या सिरीज मध्ये दुसरे ४५६७७१ या नंबरचे नवीन मीटर व बसविलेले अपीलार्थीस न सांगता काढून नेल्यामुळे पुर्वीचे मीटर व नवीन बसविलेले मीटर यांचे रिडींग किती. तसेच रिडींगबाबत काय कारवाई केली २) मीटर काढतांना व नवीन बसवितांना परवानगी घेतली नाही ३) मीटर नेण्याऱ्याचे नांव, पत्ता इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती, उप कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. भुसावल यांच्या संबंधीत असल्याने विहित वेळेत त्यांचा अर्ज हस्तांतरित केला.

जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यांत जन माहिती अधिकारी यांच्या चुकीमुळे अपीलावर सुनावणी झाली परंतु प्रत्यक्षात प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कार्यालयांत बोलावून त्यांचे संपूर्ण शंकाचे निरसन करावे व तसे अधिक्षक अभियंता यांना अवगत करावे.

अपिलार्थीस योग्य माहिती न मिळाल्याने व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीस प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यांत आले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ४.०७.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस त्यांच्या प्रत्येक मुद्यांचे खंडन करुन माहिती दिलेली आहे, संपुर्ण प्रकरणांत अपीलार्थीस उप कार्यकारी अभियंता शहर उप विभाग - १ महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.लि. भुसावळ यांनी त्यांचे दिनांक १३.०२.२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रत्येक मुद्यास अनुसरुन दिलेली माहिती पाहिलीतर ती योग्यपणे स्पष्टिकरणासह दिलेली दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५२ /०२**

**श्री.शामराव तावबा कवडे,** **------- अपीलकर्ता**
**प्लॉट नं. ४९, कवडे निवास, खान्देश मिलमागे,**
**तानेश्वर विद्यामंदिराच्या पाठीमागे,**
**चाळीसगांव, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव,**
**जि. नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामसेवक ग्रामपंचायत बाणगांव (बु), तां.नांदगांव,**
**जि.नाशिक.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १६.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.शामराव तावबा कवडे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) ग्रामपंचायत बाणगांव यांनी चिमण रो. देवकर यांना खाजगी पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीने परवानगी दिली का. जर दिली असलीतर ग्रामपंचायत व प्रासिडींग ठरावाची नक्कल व परवानगी दिल्याच्या ठरावाची नक्कल २) खाजगी माणसाकडून ग्रामपंचायतीला पाणी पुरवठा करता येतो का. पाणीपट्टी बद्दल इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८.०४.२००९ च्या पत्राव्दारे पाणीपट्टीची आकारणी रक्कम सोडून बाकी सर्व मुद्यावर नकारात्मक उत्तर अपीलार्थीस देण्यात आले.

माहिती न दिल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी यावर कोणतेही भाष्य केले नाही व आदेशही पारित केले नाहीत या कारणास्तव अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी अशी तकार केली की गट नं. १३८/३,७/१२ च्या च्या उतार्‍यावर विहिर व बोर आहे खाजगी व्यक्तीनी पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन फुटुन शेतीचे नुकसान झाले त्यांनी पाणीपुरवठा करणार्‍या लोकांची यादी सादर केली आहे त्याचप्रमाणे रु. १५०/- प्रत्येक लोकांकडून पाण्यासाठी वसुल केले. अर्जदाराची तक्रार पैसे घेऊन खाजगी पाणीपुरवठा करण्यात आला अशी दिसते. मात्र या संदर्भात ग्रामपंचायतीने कुठलिही परवानगी दिली नाही त्यामुळे याबाबतीत कुठलेहि कागदपत्र ग्रामपंचायतीकडे नाही. गावातील खाजगी पाणीपुरवठयाबाबत जर अर्जदाराची काही तक्रार असेलतर ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद किंवा संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकार्‍याकडे करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १० /०२**

**श्री. मुकेश शांतीलाल ललवाणी, ------- अपीलकर्ता**
**५६, देव दर्शन अपार्टमेंट, जय नगर औकारेश्वर**
**मंदिरामागे, जळगांव, ता.जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**अधिक्षक अभियंता, नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०१.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. मुकेश शांतीलाल ललवाणी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी,अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.१०.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली त्यांच्या दि.४.०३.२००८ च्या मौजे देवळाली शिवरातील सर्व्हे नं. ४८/२ या जमिनीचा अंतीम ले आउट दिलेली मंजूरी रद्द करणेबाबतचा व दत्तू कदम हे मयत असताना त्यांचेसाठी लबाडीने परवानगी मिळवून गुन्हा केल्याबाबत करण्यासाठी व इतर बरीच माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या त्यांच्या दि.१.१२.२००८ च्या पत्राव्दारे अर्जदारास त्याच्या मुद्देनिहाय माहिती दिलेली आहे. पत्रावरील स्वाक्षरी तपासणे शहानिशा करणे इत्यादि तपासणी जबाबदारी या कार्यालयाची नसल्याचे कळविल आहे.

अपीलार्थीस पत्रात नमूद केलेली माहिती मान्य नसल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२३.०१.२००९ रोजी सुनावणी ठेवली परंतु अपीलार्थीने काही कारणास्तव ती पुढे ढकलण्यास सांगितले

त्याप्रमाणे ती दि. २४.०२.२००९ रोजी ठेवण्यात आली त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीच्या गैरहजेरीत सुनावणी घेतली व अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी योग्य असल्याचे सांगितले तरीही अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिलेली आहे. २) प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दोन वेळा सुनावणी ठेऊनही अपीलार्थी गैरहजर राहिले. ३) जन माहिती अधिकारी यांनी शिवारातील स.न.४८/२ या जागेचा अंतिम अभिन्यास दि.२४.०८.२००० रोजी मंजूर झालेला आहे हा अभिन्यास रद्द करावा अशी मागणी अपिलार्थीची होती परंतु अभिन्यास रद्द करणे सध्या ज.मु.पत्राची तपासणी बाबीची शहानिशा करणे इत्यादि तपासण्याची जबाबदारी या अधिनियमात अभिप्रेत नाही त्यामुळे अपीलार्थीने अभिन्यास रद्द करण्यासाठी संबंधीत अपीलीय प्राधिकाऱ्याकडे धाव घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे आयोगाचे मत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५१ /०२**

**श्री. सुरेश सिताराम अहिरे,** **------- अपीलकर्ता**
**प्रोफेसर कॉलनी सरोदे हॉस्पीटल जवळ,**
**भुसावळ,जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सचिव, ए.ई.संस्थेचे कनिष्ठ महाविद्यालय (शिक्षण),**
**सातभाई माळा,अहमदनगर.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्राचार्य, शिक्षण पदविका विद्यालय,**
**ए.ई. सोसायटी संस्था, सातभाई माळा,अहमदनगर.**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : २४.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. सुरेश सिताराम अहिरे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित होते तर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) श्री. घनश्याम काशिनाथ इंगळे यांचे अध्यापन पदविका परिक्षा गुणात खाडाखोड केलेल्या गुणपत्रकाची तपासणी करुन प्रायार्चांच्या स्वाक्षरीसह सील करुन पाठविल्याबाबत २) श्री.इंगळे कॉलेजात होते का मूळ गुणपत्रक पडताळणीची मूळ रेकॉर्ड किती वर्षापर्यंत उपलब्ध असते याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०९.२००९ च्या पत्राव्दारे अर्जदारास मुद्दा क्र.१ नुसार श्री.इंगळे यांचे गुण्पत्रक ४० वर्षापूर्वीचे आहे त्याची छायांकित प्रत कोणत्याही जबाबदार व्यक्तीने सांक्षाकित केलेली प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती

देता येत नाही. मुद्दा क्र. २) श्री.इंगळे यांनी १९६९ साली पास झाल्याचे दिसून येते तसेच गुणपत्रकांचा रेकॉर्ड पाच वर्षापर्यंत सांभाळून ठेवयात येतो असे अपिलार्थीस लेखी कळविण्यात आले आहे.

अपूर्ण व चुकीची माहिती दिली गेल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी श्री.इंगळे यांचे प्रकरणी १९६९ ते १९७१ या कालावधीतील असल्याने त्यांचा तपशील कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे गुणपतत्रकाची पडताळणी करता येणे अशक्य आहे. श्री.इंगळे अध्यापन पदविका पास झाल्याचे प्रमाणपत्र मा.आयुक्त शासकीय परिक्षा मंडळ, शिक्षण संचालनालय मा.राज्य पुणे यांनी सुन १९७१ मध्ये स्वाक्षरी करुन दिलेली असल्याने अपीलार्थीने पुणे येथे संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती घ्यावी असे दि. १३.११.२००९ च्या पत्राव्दारे कळविले आहे.

अपीलार्थीचे यामुळे समाधान झाले नाही जी माहिती मागितलेली आहे ती देण्यांत येत नाही असे त्यांचे म्हणणे असल्याने व्दिती अपील दाखल करण्यांत आले सुनावणीच्याव वेळी अपीलकर्ता व उत्तरवादी उपस्थित हाते. एकंदरित या प्रकरणी असे दिसूनयेते की श्री.इंगळे हे १९६९ ते १९७१ पर्यंतच्या कालावधीत डी.एड.साठी अध्यापक विद्यालयांत होते, त्यांना पदविका घेऊन ४० वर्षे होऊ गेलेली आहेत त्यामुळे त्यांचा मूळ रेकॉर्ड उपलब्ध होत नाही तसेच मूळ गुणपत्रक संबंधित छात्र अध्यापकास निकाल लागल्यानंतर मा.शिक्षण उपसंचालक पुणे यांच्याकडून त्यांना दिले जाते त्याची छायांकित प्रत कार्यालयाकडे उपलब्ध नसते ती प्रत मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे तसे उचित आहे. मात्र अशा परिस्थितीत अर्जदाराचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांनीच पुणे येथील शिक्षण संचालनालयाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती देण्यासाठी पाठवावयास पाहिजे होता. माहिती अधिकार कायद्यानुसार असे करणे आवश्यक आहे त्याची नोंद घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ६८ /०२**

**श्री. पाटील शेनफडू टिकाराम,** **------- अपीलकर्ता**
**रा.निमखेड, पा.घानखेड, ता.बोदवड,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अधिक्षक, भूमि अभिलेख, जळगांव, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, बोदवड,**
**जि. जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १२.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. पाटील शेनफडू टिकाराम, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होत.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली मौजे निमखेड, ता.बोदवड येथील निमखेड गट नं.१३ ची मोजणीबाबत दि. १.०७.२००८ रोजी नामदेव देवराम पाटील यांनी सरकारी नियमाप्रमाणे चलनाव्दारे पैसे भरलेले आहेत. तरीही अद्याप त्यांची मोजणी का होत नाही याची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही न दिल्याने अपीलार्थीने प्रथम अपीली दाखल केले. त्यावर दिनांक १४.०८.२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी १५.०६.२००९ यांनी मोजणी अर्जदार श्री.नामदेव देवराम पाटी यांना गट नं.१३ लगत असलेली २०४ ची ही मोजणी करुन हवी आहे त्यामुळे त्यांनी जरी गट नं. १३ मोजणीचे पैसे चलनाने भरले असले तरी लगत गटाची मोजणीसाठी पैसे भरण्यास अपीलार्थीस सांगण्यात आले. तसेच गट नं.१३ चे कागपत्रे तालुका भुमि अभिलेख बोदवड हे कार्यालय नव्याने झाल्याने अभिलेख स्थलांतराच्या वेळी गहाळ झाले त्यामुळे उशीर झाला आहे असे

त्यांनी दि. १२.०५.२००९ च्या पत्राव्दारे कळविले आहे. अशी माहिती अपिलार्थीच्या गैरहजेरीत प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना देण्यात आली.

अपीलार्थीने व्यथीत होऊन व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले त्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

त्यावेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती १) मौजे निमखेड येथील गट नं.१३ चे हद्द कायम मोजणीचे फी अर्जदाराने भरलेली आहे परंतु अर्जदार यांनी दिनांक २९.०५.२००९ चे अर्जाव्दारे गट नं.१३ मे पूर्वेस रस्ता असुन रस्ता मोजणी करुन मागणी केलेली आहे. गट नं. १३ चे पूर्वेस गट नं. २०४ हा लागून आहे त्यामुळे त्याची मोजणी फी भरण्याबाबत अर्जदारास कळविलेली आहे ती भरल्याशिवाय मोजणी करता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे हे जरी योग्य असले तरी अर्जदाराने पूर्वी सादर केलेले कागदपत्रे हरवलेली आहे ती मिळाली की नाहीत याचा उलगडा झालेला नाही.

अपिलार्थीस खरोखरच मोजणी करुन घ्यावयाची असल्यास त्यांनी गट नं. २०४ ची एकूण जी काही फी आहे ती भरावी त्यांनी गट क्र. १३ ची रु. ५००/- फी भरलेली आहे तर उर्वरित फी भरुन जमीन मोजणी करुन घ्यावी.

अर्जदाराने गट नं. १३ च्या जमीन मोजणीची फी भरलेली आहे आवश्यक असल्यास अर्जाच्या छायांकित प्रती घेऊन नव्याने कागदपत्रे तयार करावीत व एंकदरित या प्रकरणात अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी संगणमताने प्रकरण निकाली काढणे आवश्यक आहे. दोघांनी ताठर भूमिका घेऊ नये. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत अपीलार्थीने उर्वरित फी भरल्यानंतर १५ दिवसांत अपिलार्थीस माहिती द्यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारीस तसे निर्देश द्यावेत त्यांनीही जबाबदारी झटकून टाकू नये. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५६ /०२**

**श्री. समसोद्दीन शेख चिरागोद्दीन,** **------- अपीलकर्ता**
**डांगपूरा मस्जिद जवळ, मु.पो. यावल,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, महा.राज्य विज वितरण कं.मर्यादित,**
**सावदा, ता.रावेर,जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, महा.राज्य विज वितरण कं.मर्यादित,**
**मु.पो. यावल, जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.०५.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. समसोद्दीन शेख चिरागोद्दीन, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३१.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) रु.३९९/- वाजरलेल्या विजबिलाची रक्कम नसून सेक्युरीटी डिपॉझिटची रक्कम असतांना ज्या निमाने विजबिलातून वसूल करण्यांत अली तो नियम. २) सुरक्षा ठेव रु. ४५९/- पाहिजे होती अथवा कसे ३) सेक्युरिटी डिपॉझिट किती वसूल करणार ४) सेक्युरिटी डिपॉझिट मीटर बसविण्यापूर्वी घेणे इष्ट होते व ती वाढविण्याची कारणे इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.०१.२००९ य्या पत्राव्दारे अपीलार्थीस खुलासेवार माहिती दिलेली आहेत. परंतु अपीलार्थीस ती चुकीची वाटल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथीत होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल

केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. फक्त प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की सुरक्षा ठेव विज नियामक आयोग यांचे आदेशास्तव वेळोवळी घेण्यात विज बिलाच्या अटीवर आकारण्यांत येते ती अगोदर स्विकारण्यांत येते पण पुढी विज दरात वाढ झाल्यामुळे ती वाढीनुसार स्विकारण्यात येते जर पुढे आणखी विज दर वाढलेतर सुरक्षा ठेव वाढविण्यांत येईल. पुर्वीची सुरक्षा ठेव ही बिलाचा हप्ता भरण्यासाठी सुध्दा तात्पुरती वापरली जाते. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सविस्तर माहिती दिली असल्याचे दिसून येते. अपीलार्थी सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्यामुळे त्यांना नक्की कोणती माहिती कशाप्रकारे हवी होती याचा उलगडा होऊ शकला नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकारी याप्रकरणी संपूर्णतः दुर्लक्ष केलेले दिसते ज्या कामासाठी त्यांची नेमणूक केली आहे ती योग्यरित्या पार पाडण्याची जबाबदारी त्यांनी यापुढे स्विकारावी अशी अपेक्षा आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५९ /०२**

**श्री. निळकंड दगडू पाटील, ------- अपीलकर्ता**
**रा.बिलखेडे, पो.जांभारे, ता.धरणगांव,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**अधिक्षक, भूमि अभिलेख, जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, एरंडोल,**
**मु.पो.ता. एरंडोल,जि. जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०९.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. निळकंड दगडू पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) गट नं. २४८ चा नकाशा असेल तर त्याचा सातबारा उतारा असणे आवश्यक असते अथवा कसे २) प्लॉट नं. १६ ची मोजणी फी भरली नंतर ज्या नियमाने गट नं. २४८ मधील प्लॉट नं.१६ ची मोजणी करण्यात आली त्याचे नियम ३) प्लॉटची १ एकास ५०० च्या किंवा १००० प्रमाणांत मोजणी करण्यात येते त्याचे नियम या अनुषंगाने एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.०४.२००९ च्या पत्राव्दारे मुद्या क्र. १ ची माहिती उपलब्ध नसल्याने ती कळविली नाही परंतु पुढील ६ मुद्यांची माहिती अपीलार्थीस दिली. परंतु चुकीची माहिती दिली या कारणास्तव अपीलार्थीने प्रथम अपीली दाखल केले. त्यावर दिनांक २९.०५.२००९, ९.०६.२००९, २१.०७.२००९ व ११.०८.२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी झालेल्या चर्चेत असे आढळून आले की अपीलार्थीने यापूर्वी ही अपील करुन प्लॉट नं. १६ ची मोजणी फी भरुन करण्यास सांगितली होती ती मोजणी दिनांक १७.०२.२००९ रोजी करण्यांत आलेली आहे व सदर नकाशाची नक्कलही देण्यात आलेली आहे. मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ ते ७ ची सविस्तर माहिती पुरविण्यांत आली आहे.

अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले त्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी असे निदर्शनास आले की अपीलार्थीने यापूर्वीही अपील दाखल केले होते. प्लॉट नं. १६ ची मोजणी व नकाशा अपीलार्थीस पूर्वीच दिलेला आहे. आता त्यांना प्लॉट नं. १६ च्या लगत प्लॉट नं. ४६ ची मोजणी करुन नकाशा पुरविण्याची विनंती आहे त्याप्रमाणे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना गट नं. ४६ ची मोजणी करुन अपील अर्जदारास मोजणी नकाशा तात्काळ पुरवावा. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे की अपीलार्थीने त्याची प्रथम फी भरावी त्यानंतर त्याची मोजणी करण्यांत येऊन नकाशा देण्यांत येईल तरी अपीलार्थीस खरोखरच मोजणी करुन घेण्याची इच्छा असेलतर त्यांनी त्यांना हव्या असलेल्या गट नं. ची फी भरुन मोजणी करुन घ्यावी जन माहिती अधिकारी यांचे फी भरण्यासंबंधीचे म्हणणे योग्य वाटते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ४३ /०२**

**कु.भाग्यश्री प्रमोद लोखंडे** ------ **अपीलकर्ता**
**सुप्रभा, प्लॉट नं. २९, गट नं. ६१,**
**कोल्हे नगर, जळगांव ४२५ ००१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**सह संचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**सह संचालक, (उच्च शिक्षण) जळगांव विभाग,**
**जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०४.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार कु.भाग्यश्री प्रमोद लोखंड,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी,अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.८.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली शासन निर्णयानुसार सन २००६ ते सन २००९ या वर्षाचे आपल्या कार्यालयांत सादर केलेले फ्री शिपची रक्कम का अदा करण्यांत आली नाही याची माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जाची दखल घेतली नाही. म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली आहे असे त्यांच्या पारित केलेल्या दिनांक १८.०६.२००९ च्या पत्रात नमूद केले आहे परंतु प्रत्यक्षात नस्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेले पत्र आढळून आलेले नाही पण जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असे गृहीत धरुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलावर कोणतीही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथीत होऊन अपिलार्थीने आयोगाकड व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १)अपीलार्थीस त्यांच्या फी माफीची कोणतीच माहिती प्राप्त झाली नाही तसे जन माहिती अधिकारी यांचे पत्र नस्तीमध्ये आढळून येत नाही. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी काय माहिती दिली याचा त्यांच्या पत्रात कोणताच उल्लेख केलेला नाही माहिती दिली आहे असे गृहित धरुन आदेश पारित करण्यांत त्यांनी नकार दिला. ३) आयोगाच्या सुनावणीच्या दिवशी दि. ५.०३.२०१० रोजी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी मा.शिक्षण संचालक (उ.शि.) महाराष्ट्र राज्य पुणे यांना पत्र लिहून माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलत मंजूर करण्याचे आदेश व्हावेत असे कळविले आहे. यावरुन असे दिसते की प्रत्यक्षात अपीलार्थीचा फी माफीचा प्रस्ताव संबंधीत विभागाकडे पाठविण्यांत आलेला दिसत नाही. अपीलार्थीस त्रास होईल असे वागणे माहिती न देणे, टालवाटोलवी करणे इत्यादि बाबी या प्रकरणांत दिसून येतात याकरिता जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांच्यावर रु. ३०००/- ची शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या १ जून २०१० या महिन्यांच्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास १५ जून २०१० पर्यंत चलनाच्या प्रतीसह पाठवावा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाकडील सुनावणीच्या दिवशी फी शिपचे अर्ज मा. शिक्षण संचालक (उ.शि.) महाराष्ट्र राज्य पुणे१ यांच्याकडे पाठवित असल्याचे दिसून आले ही कृती त्यांनी ६/७ महिन्यापूर्वी करुन अपीलार्थीस तेव्हाच कळविले असते तर अपीलार्थीचे समाधान तरी झाले असते परंतु कोणतेही काम जबाबदारीने करावयाचे नाही वेळकाढू धोरण यामुळे जन मानसात अधिकारी वर्गाची प्रतीमा, मलीन होते तरी यापुढे जबाबदारीने वागावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ३९ /०२**

**श्री.किशोर पांडुरंग सोनार** **------ अपीलकर्ता**
**रा.बेलसवाडी, ता.मुक्ताईनगर,**
**जि.जळगावं.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप विभागीय कृषि अधिकारी, जळगांव, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, मुक्ताईनगर, ता.मुक्ताईनगर,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १०.०१.२००८
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री .किशोर पांडुरंग सोनार, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनपुस्थित होते, तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२२.०७.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली सन २००७-०८ ते ऑगस्ट २००८ पर्यंत कृषि विभागांतर्गत ज्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यांत आला तसेच सध्याच्या चालू वर्षासाठीच्या योजना व त्यासाठी असलेले लाभार्थी यांची योजना निहाय सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी जळगांव यांनी दिनांक २२.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांना माहिती त्याच्या अखत्यारित असल्याने त्यांच्याकडे त्याच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी हस्तातरित करण्यात आला. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही या कारणास्तव अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनीही अपीलार्थीस कोणतेही आदेश पारित केले नाहीत त्यामुळे व्यथीत होऊन शेवटी अपीलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते, तर प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीच्या एकाही अर्जावर/अपीलावर कोणतीही कार्यवाही केली नाही. सुनावणीच्या वेळी दोघेही अधिकारी अनुपस्थित होते कामात टाळाटाळ करणे माहिती माहिती मागल्यास आलेल्या अर्जदारास दुर्लक्षित करणे,अशी प्रवृत्ती दिसून आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने अर्ज करुन वर्ष झाले तरी साधी व सरळ माहिती त्यांना ते देऊ शकले नाही. या त्यांच्या माहिती न देण्याच्या कृती बद्दल त्यांना दोषी धरुन त्यांच्यावर रु. ५,०००/- रु. ची शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या जून २०१० या महिन्यांच्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल अपीलीय अधिकारी यांनी आयोगास १५ जुलै, २०१० पर्यंत चलनाच्या प्रतीसह पाठवावा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही बेजबाबदारपणे हे प्रकरण हताळले. अपीलाचे आदेश सुध्दा त्यांनी दिले नाहीत याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. अर्जदारास ७ दिवसात माहिती देण्याची जबाबदारी सुध्दा आता अपीलीय अधिकारी यांचेवर टाकण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी शास्ती वसुलीची कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १७.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ४२ /०२**

**श्री.परेश ललीतचंद शाह,** **------ अपीलकर्ता**
**रा.आय.यु.डी.पी.प्लॉट नं २२, तांबेपुरा,**
**मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगाव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अधिक्षक भूमी अभिलेख, जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका निरीक्षक भूमि अभिलेख अमळनेर,**
**मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगाव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.परेश ललीतचंद शाह, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) अमळनेर येथील सि.स.नं.३०१८ ची मिळकत सि.स.नं. ३२१६/ अ-२ मध्ये सामील झाली असल्यास कधी तसेच सि.स.न. ३०२८ ची सामील होण्यापूर्वीची नक्कल. २) सि.स.न. ३२१८/क वर नाव असलेल्या व्यक्तीच्या अर्जाची नक्कल प्रत ३) सि.स.न. ३२१६/ अ-२ मिळकतीवर दाखल असलेले वाटप अर्ज ४) सि.स.न. ३२१८ मे सिव्हील धुळे यांच्या हुकुमाची प्रत ५) सि.स.नं. ३०१८,३२१६/अ-२, ३२१८/क या मिळकतीच्या रजिस्टर मधील नकला इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी माहिती अधिकारी यांनी मागितलेले कागदपत्रे जीर्ण असल्याने ती पुरविता येत नाही असे नमूद करुन ३२१६/अ-२ मिळकत पत्रिका पहावा सि.स.नं. ३०१८ ही मिळकत सामील केल्याची नोंद नाही तर मुद्या क्र २ ते ५ ची माहिती कागदपत्रे जीर्ण असल्याने देता येत नाही असे दिनांक ११.०५.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस कळविले.अपीलार्थीने माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक २२.०७.२००९ रोजी सुनावणी

घेतली त्यावेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेत अपिलार्थीने आपली बाजू मांडली की जन माहिती अधिकारी लबाडी करुन दुसऱ्याच व्यक्तीची प्रापर्टी बद्दल माहिती देतात तर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा शोघ घेऊन मालमत्तेच्या रजिस्टर मधील माहिती द्यावी त्याप्रमाणे शोध घेतल्यावर प्रॉपर्टी रजिस्टर हे अत्यंत फाटक्या व जीर्ण अवस्थेत असल्याने माहिती पुरविता येत नाही असे सांगितले परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस दि. २९.०७.२००९ पर्यंत माहिती देण्याचे निर्देश दिले परंतु तरीही माहिती देण्यात न आल्याने त्यांना १५ दिवसांची मुदत दिली तरीही माहिती दिली नाही म्हणून अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपीलीय अधिकाऱ्यांचे म्हणने सुध्दा प्रॉपर्टी रजिस्टर हे जीर्ण झाले असल्याने त्याच्या प्रती देता येत नाही असे आहे. प्रॉपर्टी रजिस्टर हे जीर्ण असल्याने त्याच्या प्रती देता येऊ शकत नाही हे अपीलीय अधिकारी यांनी स्वतः प्रत्यक्ष रजिस्टर दाखवून अर्जदारास पटवून द्यावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १२२/०२**

**श्री. संतोष नामदेव चंदनशिव** ------ **अपीलकर्ता**
**रा.ताडेपुरा, भिमनगर (टेकडी भाग),**
**अंमळनेर, ता.अंमळनेर, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**प्रकल्प संचालक नगरपालिका शाखा,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय,**
**जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २३.११.२००९
सुनावणीचा दिनांक :.६.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दिनांक २१.०८.२००९ च्या अजाव्दारे त्यांनी दि. ५.०३.२००९ रोजी दिलेल्या अर्जानुषंगाने झ ालेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला. परंतु त्यांना उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दिनांक २९.१०.२००९ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

अपीलार्थीनी मागितलेली माहिती नगरपरिषद अंमळनेरशी संबंधीत असल्याने मुख्याधिकारी नगरपरिषद अंमळनेर यांनी १५ दिवसांत माहिती द्यावी.

तथापि अपीलार्थींना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादी गैरहजर होते. अपीलार्थींच्या कथनानुसार त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. अपीलार्थींनी मागितलेली माहिती जर नगरपरिषद अंमळनेरशी संबंधीत होती तर माहिती अर्ज प्राप्त झाल्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार तो अर्ज नगरपरिषदेकडे ५ दिवसांच्या आत वर्ग करावयास हवा होता पण तसे करण्यात आलेले नाही. याचा विचार करुन आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थींना त्यांच्या मूळ ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिला होता त्यांनीच म्हणजे जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपरिषद शाखा, जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालय

यांनी नगरपरिषद अंमळनेरकडून माहिती प्राप्त करुन सदर आदेशाच्या दिांकापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १६४/०२**

**श्री. महंमद शफी अक्कलोद्दीन काझी, ------ अपीलकर्ता**
**काझीवाडा, वाडी चौक. अंमळनेर,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उपसचिव, राज्य माहिती आयोग औरंगाबाद कार्यालय,**
**औरंगाबाद**

**जन माहिती अधिकारी**
**राज्य माहिती आयोग औरंगाबाद कार्यालय,**
**औरंगाबाद**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ५.११.२००८
सुनावणीचा दिनांक :.६.०३.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दिनांक १४.०७.२००८ च्या अजाव्दारे अशी माहिती मागितली की एका प्रकरणात आयोगाने सक्त ताकीद देण्याचे निदेश दिलेत. तरी या बाबतीत असलेल्या नियमाची माहिती मिळावी.

यावर उत्तरा न मिळाल्याने त्यांनी दि. १४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर दि. १६.०९.२००८ रोजी निर्णय देण्यात आला व त्यांना असे कळविण्यात आले की आयोगाने दिलेले निर्णय अर्धन्यायिक स्वरुपाचे असून त्याबाबत कारणे देणे कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येत नाही.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता आयोगाचे असे मत झाले की त्यांचे आदेश न्यायोचित आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई, दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १/०२**

**श्रीमती (ॲड) शोभना सुभाष मुळे,** **------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं.२५, चिंतामणी, गणपतीनगर, जळगांव**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सह जिल्हा निबंधक वर्ग -१, मुद्रांक**
**जिल्हाधिकारी यांचे कार्यालय आकाशवाणी चौक,**
**जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.दुय्यम निबंधक वर्ग २, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.१०.२००९
सुनावणीचा दिनांक :.५.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक १५.०६.२००९ च्या अजाव्दारे दि. १४.०१.२००२ रोजी दस्तऐवज क्र. ९७/२००२ च्या प्रमाणित प्रतीची मागणी केली याबाबत त्यांना दि. २६.०६.२००९ रोजी असे कळविण्यात आले की त्यांनी रु. ५/- प्रति पृष्ठ व रु. २०/- चे कोर्ट फी लेबल याची एकत्रित रक्कम भरावी व नंतर प्रमाणित प्रती देण्यात येतील.

यावर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २४.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. ०७.०८.२००९ रोजी निर्णय देण्यात आला त्यानुसार आकारण्यात आलेली फी वाजवी असल्याचे नमूद करण्यात आले व फी भरुन प्रती घेण्याचे अपिलार्थींना निदेश देण्यात आले. या निर्णयाविरुध्द अपीलार्थींनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी सादर केले की दस्ताऐवज देण्यासाठीचे शुल्क माहिती अधिकार अधिनियम लागू होण्याआधीपासून निश्चित केलेले आहेत. तेव्हा वाजवी शुल्क आकारण्यात आले आहे. याचा

विचार करुन आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थींनी शुल्काची रक्कम भरावी. जन माहिती अधिकारी यांनी शुल्काच्या रकमेचा भरणा केला आहे याची निश्चिती करुन अपीलार्थींना छायाप्रती पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं.१६०/०२**

**श्री.सुरळकर नागसेन राजाराम,** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.नाडगांव (दादानगर), ता.बोदवड,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता शहर व ग्रामीण,**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, भुसावळ.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,**
**शहर तथा ग्रामीण विभाग सब डिविजन, मुक्ताईनगर, जि. जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ६.०३.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दिनांक १४.०८.२००९ च्या अजाव्दारे दि. ०१.०१.२००५ ते दि. ३०.०५.२००९ य कालावधीतील खालील माहितीच्या प्रती मागितल्या

१) डेडस्टॉक रजिस्टर.

२) लिलाव केलेल्या वस्तुंचा तपशील.

३) लिलावाची रक्कम जमा केल्याबाबत कॅश बुकाच्या नोंदीच्या प्रती.

४) मुक्ताईनगर येथे शेती पंपासाठी केलेल्या अर्जाच्या प्रती.

५) वीज उपयोगी साहित्य तालुक्याला पुरविलेल्या पत्राच्या प्रती

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १८.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी असे सादर केले की अपीलार्थींनी केलेल्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती पुरवावयाच्या झाल्यास रेकॉर्ड विस्कळित होण्याची शक्यता आहे. तेव्हा अपीलार्थींनी प्रत्यक्ष येऊन

माहिती घेणे योग्य ठरेल. याबाबत त्यांना लेखी कळविले आहे. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की त्यांनी कार्यालयात जाऊन रेकॉर्ड बघावे व आवश्यक तेवढया कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्यावा. आयोगाचे असेही निदेश आहेत की यासाठी अपीलार्थीकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४८ /०२**

**श्री.श्रीकांत मधुकर भोईटे, ------ अपीलकर्ता**
**शिवाजी नगर, मु.पो.यावल, ता.यावल.**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद यावल, ता. यावल,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कनिष्ट अभियंता, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.श्रीकांत मधुकर भोईटे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) यावल शहरात खिर्नीपूरा मशीद समोर संत रोहिदास नगरमध्ये माजी नगरसेवक इकबाल खॉ बशीर खॉ यांनी केलेले अतिक्रमण बांधकामाबाबत नगरपरिषदेने त्यांचेवर काय कार्यवाही केली जागेची कर आकारणी झालेली आहे काय २) सदरचे अतिक्रमण बांधकामाची नगरपरिषद दप्तरी नोंद आहे काय.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी असे तिघेही अनुपस्थित होते.

हेच मुद्दे असलेला अर्जदाराने दुसराहि अर्ज व त्यानंतरचे व्दितीय अपील क्र.१५० केलेले दिसून आले. त्या अपीलाची सुनावणी सुध्दा दिनांक ६.०३.२०१० रोजी ठेवली होती व त्यात शास्तीचे आदेश पारित केले आहेत. त्यामुळे हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४९ /०२**

**श्री.श्रीकांत मधुकर भोईटे, ------ अपीलकर्ता**
**शिवाजी नगर, मु.पो.यावल, ता.यावल.**
**जि.जळागांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद यावल, ता. यावल,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कनिष्ट अभियंता, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा प्राप्त झाल्याचा दिनांक : ११.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.श्रीकांत मधुकर भोईटे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) यावल येथील पेट्रोल पंपासमोरील अकबर खालील यांचे घरापासून ते दिली दरवाजा पर्यंतची जागा ही नकाशावर कोणचे नावाने आहे. सदर जागेमध्ये एक मजली पासून ते तीन मजली पर्यंत बांधकाम झालेले सदरचे बांधकाम करतांना त्यांनी परवानगी घेतली असल्यास त्याची नक्कल अतिक्रमण असल्यास नगरपालिकेने काय कार्यवाही केली. ३) यावल नगरपालिकेने डिव्हायडर बांधकाम करतेवेळी सदर जागेचा नकाशा घेतलेला आहे त्याची नक्कल याची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही या कारणास्तव अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्याची सुनावणी दिनांक ८.०७.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपीलार्थी हजर होते. जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले असता त्यांनी अपिलार्थीस ८ दिवसांत माहिती देण्यात येईल असे सांगितले. परंतु अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित होते

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी स्वतः अनुपस्थित होते व अनुपस्थितीबाबत त्यांनी लेखी व तोंडी आयोगास कळविलेले नाही. त्यामुळे त्यांना या दरम्यानच्या काळात माहिती मिळाली किंवा नाही हे कळू शकत नाही. त्यामुळे अपीलीय अधिकारी यांनी हे आदेश मिळताच पाच दिवसात त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अर्जदारास माहिती दिली आहे याची खात्री करुन घ्यावी. माहिती दिली नसेल तर ती पाच दिवसांत स्वतः समक्ष देण्याची कार्यवाही अपीलीय अधिकाऱ्यांनी करावी. अर्जदाराच्या याच कालावधीत सुनावणी असलेल्या दुसऱ्या अपीलाच्याबाबतीत माहिती देण्यास विलंब केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावली आहे. त्यामुळे या प्रकरणात जरी शास्तीचे आदेश देण्यात येत नसले तरी मुदतीत माहिती न दिल्याचे यानंतर पुन्हा दिसून आल्यास त्यांची विभागीय चौकशी करुन शासन करण्यात येईल अशी समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ४०९४ /०२**

**श्री.किशेर काशीनाथ घोगरे** **------ अपीलकर्ता**
**३८,तृप्ती सदर को.ऑ.हौसींग सोसायटी, लि.,**
**९० फूट रोड, काजूपाडा, कुर्ला (प) ,**
**मुंबई ४०० ०७२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला,**
**स.गो. बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, (जल), बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, ४ था मजला,**
**स.गो. बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.किशेर काशीनाथ घोगरे, मुंबई यांनी दिनांक ३०.०७.२००८ च्या माहतीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (जल ) एल वार्ड कार्यालय यांचेकडे जल जोडणीसंदर्भात एकूण ६ मुद्यांची माहिती मागविण्यात आली होती

सहायक अभियंता (जलकामे) एल विभाग यांनी दिनांक २८.०८.२००८ रोजी रु. ६/- इतकी रक्कम माहितीसाठी भरण्याबाबत कळविले. सदर उत्तराने समाधान झाले नाही म्हणून दि. १.०९.२००८ रोजी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. ५.११.२००८ रोजी आदेश देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विनामुल्य माहिती द्यावी तसेच अपीलार्थीने देखील सहायक अभियंता यांचेशी संपर्क साधुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने समाधान न झाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. संबंधितांविरुध्द योग्य ती कारवाई करुन विनामुल्य माहिती द्यावी असे नमूद केले आहे.

सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक २५.०३.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती त्या सुनावणीस विद्यमाने जन माहिती अधिकारी श्री. अर्जितवार हे हजर होते.

दिनांक ३०.०७.२००८ रोजीच्या अर्जावर दिनांक २८.०८.२००८ रोजी शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे पत्र जन माहिती अधिकारी यांनी पाठविले आहे. तसेच माहिती कशी पाहिजे या सदराखाली त्यांनी व्यक्तिशः असे लिहीले असल्याने अर्जदाराने स्वतः माहिती घेऊन जाणे हे अभिप्रेत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०३.२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दि. ५.०४.२००९ पर्यंत अर्जदारास अपीलीय अधिकाऱ्यांचे आदेशाप्रमाणे माहिती देत असल्याचे लेखी निवेदन दिले आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ८१ /०२**

**श्री.अनिल कृष्णराव पाटील,** **------ अपीलकर्ता**
**रा.इंदिरानगर, भडगांव रोड, ता.पाचोरा,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**आयुक्त, (सामान्य शाखा) विभागीय आयुक्त कार्यालय,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**नाशिक महसुल कार्यालय, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०९.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अपस्थित
जन माहिती अधिकारी : अपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अपस्थित

अपीलकार श्री.अनिल कृष्णराव पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) अर्जदार यांनी खणलेली विहिर वर्ष २०१२ पर्यंत वैध व कायदेशिर आहे त्याची मुदत संपल्यावर त्याची मुदवाढ मिळू शकते परंतु जिल्हाधिकरी जळगांव यांच्या प्रेरणेनुसार कार्यकारी अभियंताने विहिर बंद करण्याचे पत्र दिले अशा प्रकारे किती शेतकऱ्यांच्या विहिर कराराबाबत पत्रव्यवहार केलेला आहे या अनुषंगाने एकूण १२ मुद्यांवर अपीलार्थीने माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.०३.२००९ च्या पत्रान्वये अर्जदाराच्या विस्तृत प्रमाणांत मागितलेली माहिती मुद्येनिहाय दिली आहे तसेच मुद्या क्र.१ची माहिती जिल्हाधिकारी कार्याल्य जळगांव या कार्यालयाशी संबंधीत असल्याने तेथे हस्तातरित केला. तसेच मुद्या क्र. ३ ची माहिती सामान्य प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक कार्यालयाशी सबंधीत असल्याने त्या मुद्यावरील माहितीसाठी अर्जाची प्रत सदर कार्यालयास हस्तातरित करण्यात आली. त्याच प्रमाणे अपिलार्थीस मुद्या क्र. ३ ची मांडणी योग्यरित्या करुन स्पष्टरित्या मुद्या मांडावा व तसे कार्यालयास कळवावे असेही सांगितले होते.

जन माहिती अधिकारी यांना माहिती अपूर्ण मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपिल दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक १०.०६.२००९ रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपीलार्थी गैरहजर होते, परंतु जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना कार्यालयातील वर्ष

२००० ते २००८ या महसुली वर्षात किती नागरिक, बाधित शेतकरी यांचे अर्ज रजिस्टर पोच देय अर्ज पाठविले असता ते कार्यालयास प्राप्त झाल नाही. मागणी नावानिशी मागितली परंतु माहिती ही मोघम स्वरुपात असल्याने त्याचे स्वरुप नक्की काय आहे यासाठी अपीलार्थीस समक्ष दोन वेळा बोलावूनही ते गैरहजर राहिले त्यामुळे त्यांचा अर्ज अधिनियम २००५ कलम २ (३) (च) नुसार माहिती या सदरात मोडत नसल्याचे अपीलार्थीस कळवून तो मुद्दा निकाली काढण्यात आला.

अपीलार्थीने मुद्दा क्र. ३ ची माहिती मिळत नाही म्हणून व्दितीय अपील दाखल केले त्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते.

एकंदरित अपीलार्थीस मुद्दा क्र. ३ सोडून इतर मुद्यांवर माहिती दिलेली आहे. त्या मुद्यांवरील माहिती मोघम स्वरुपाची व माहिती या व्याख्येत बसत नसल्याने ती अधिनियम २००५ कलम २ (३) (च) नुसार फेटाळण्यात आली तरीही प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस दोन वेळा संधी देऊनही त्यांनी या मुद्यावरील नेमकी कोणती व कशाप्रकारे माहिती हवी आहे या विषयी विचारणा केली. पण त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी वरील प्रमाणे मुद्दा क्र. ३ फेटाळून लावला.

अर्जदाराचा संपुर्ण अर्ज वाचला असता अर्जदाराच्या त्यांच्या विहीरीबाबतच्या तक्रारींची योग्य प्रकारे दखल घेतल्या जात नाही असे त्यांना ठामपणे वाटते. त्यातच " अर्ज प्राप्त झाले पण संकलित नाहीत " अशा प्रकारची उत्तरे त्यांना मिळाल्यामुळे उव्देगाने " अर्ज पाठविण्यात आले पण प्राप्त झाले नाही " अशा अर्जासंबंधी माहिती त्यांनी विचारली आहे. त्यात माहिती देय आहे किंवा नाही या पेक्षा त्यांचा उव्देग लक्षात घेणे जास्त गरजेचे आहे असे वाटते.

तांत्रिकदृष्टया अपीलीय अधिकाऱ्यांचा निर्णय बरोबर असेल पण आपल्यावर अन्याय झालेला आहे व त्याची योग्य ती दखल घेतल्या जात नाही हीच भावना अर्जदाराच्या अर्जात पदोपदी दिसते. त्यांनी त्यांच्या प्रश्नाबाबतची दाद " लोकशाही दिना " त सुध्दा मागितली होती व त्यांना उत्तर देण्यात आले आहे असे दिसते. त्यानेहि समाधान न झाल्यामुळे त्यांनी लोकायुक्त कार्यालयाकडे दिलेल्या अर्जावर जो काम निर्णय व्हायचा असेल तो होईल. पण जिल्हा/विभागीय पातळीवर तक्रारीची समाधानकारक दखल न घेतल्या गेल्यामुळेच अर्जदारास लोकायुक्तांमार्फत जावे लागले असणार.

त्यामुळे सदरील प्रकरणी " प्राप्त झाले पण आढळून येत नाही" अशा प्रकारचे उत्तर कोणत्याहि कार्यालयास शोभादायक नाही. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांच्या व अधिनस्त कार्यालयातील आवक - जावक रजिस्टर्स, कागदपत्रांची हाताळणी व हस्तांतरण याबाबतीतल्या त्यांच्या कार्यालयातील पध्दती काटेकोरपणे तपासाव्यात व त्यात योग्य तो खुलासा करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**या आदेशाची प्रत विभागीय आयुक्त नाशिक यांनाहि पाठविण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४६/०२**

**श्री. श्रीकांत मधुकर भोईटे** **------- अपीलकर्ता**
**शिवाजी नगर, यावल, मु.पो.ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुध्याधिकारी, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कनिष्ट अभियंता, नगरपरिषद यावल, ता.यावल,**
**जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. श्रीकांत मधुकर भोईटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०६.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०३.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) यावल येथील बावुजीपुरा भागात सरकारी जागेवर (बुरुज) इस्माईलखान मुकाद खान याने दुमजली इमारत बांधकाम केलेले आहे. सदर बांधकामास नगरपालिकेची परवानगी घेतली काय २) सदरचा जागेचा सि.रा.न. कोणता याची माहिती ३) जागेची कर आकारणी ४) ऐतीहासिक जागेवर अतिक्रमण केल्यावर नगरपालिकेने काय कार्यवाही केली ५) सदर जागेची खरेदी व जागा विकणारे यांचे नगरपालिका कार्यालयाशी काही नाते इत्यादि माहिती मागितली होती."

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे लेखी अथवा तोंडी माहिती दिलेली नाही त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली त्या सुनावणीस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत अपिलार्थीने ३ दिवसात माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती ८ दिवसांत पुरविण्यांत येईल असे सांगितले परंतु जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपील दाखल होई पर्यंत

कोणतीही माहिती अपीलार्थीस पुरविली  नाही या विरोधात अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित होते. अपीलार्थी गैरहजर राहिल्यामुळे त्या दरम्यान माहिती मिळाली की नाही याचा बोध होऊ शकला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी हे आयोगाच्या मुख्य सुनावणीस गैरहजर राहिले त्यामुळे त्यांनी माहिती दिली की नाही हे समजू शकले नाही. माहिती मिळाली असेल असे गृहीत धरण्यात येते कारण तसे नसते तर अर्जदार जरी उपस्थित राहू शकत नसते तरी त्यांनी माहिती मिळाली नाही असे आयोगास कळविे असते. मात्र माहिती मिळाली नसल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा व त्यांनी त्याच वेळी अर्जदारास माहिती द्यावी.

याच दिवशी झालेल्या याच अर्जदारांच्या दुसऱ्या एका अजीलात जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी वेगळे शास्तीचे आदेश नाहीत. पण यापुढे या जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेत माहिती न देण्याची पुररावृत्ती झाली तर त्याचे विरुध्द विभागीय कारवाई करण्यात येईल. याची त्यांनी नोंद घ्यावी तसेच सुनावणीच्या वेळी उपस्थित न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना समज देण्यात येते.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५८/०२**

**श्री. विजय शंकर पाचपांडे** ------- **अपीलकर्ता**
**पांडुरंग टॉकीज समोर, न्यू एशिया वार्ड,**
**भुसावळ, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, जळगांव**
**जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासनाधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ,**
**भुसावळ, जि.जळगांव.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०१.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. विजय शंकर पाचपांडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १) अर्जदाराचे सेवा निवृत्ती विषयक कागदपत्रांची पूर्तता करुन शाळेमार्फत ते आपल्याकडे कधी मिळाले. २) सेवा निवृत्तीचा प्रस्ताव किती दिवस प्रलंबित होता, जबाबदार कोण ३) प्रस्तावातील त्रृटी ४) त्रृटी संबंधीचा कार्यालयाने शाळेशी केलेला पत्र व्यवहार ५) मेडीकल क्लेमचे प्रस्ताव मंजूरीचा कालावधी ६) क्लेम मधल्या त्रृटीचे निरसन त्याची पुर्तता इत्यादि बाबींची माहिती मागितली होती.

अध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ भुसावळ यांनी अपीलार्थीचे पेन्शन चे कागदपत्र व सेवा पुस्तव दि. १०.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासनाधिकारी भुसावळ यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविले. त्यामध्ये त्रृटी आढळल्याने सदर सेवापुस्तक निवृत्ती प्रस्ताव मुख्याध्यापक झोपे प्राथमिक शाळा भुसावळ येथे परत पाठविण्यांत आले तसेच

वैद्यकिय परिपूर्तीचे रु. ३६,८००/- चे देयकी मंजूर करण्यांत आलेले आढळून आले. तसेच मेडीक्लेमचे प्रकरण शासनाकडे मंजूरीसाठी पाठविले आहे व ते शासनाकडे प्रलंबित आहे.

अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर दिनांक ३०.०७.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली परंतु त्यावर सुनावणी घेण्यात आली नाही म्हणून अपीलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. त्यापूर्वी शिक्षणाधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ३०.०७.२००९ च्या पत्राव्दारे मुद्येनिहाय माहिती दिली त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की प्रशासकीय कामकाज, सर्व शिक्षा अभियान व कर्मचारी कमतरता यामुळे प्रस्तावास उशीर झाला हे त्यांनी मान्य केले आहे.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) जन माहिती अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत दिली नाही. २) माहिती एकाच स्तरावर संकलीत नव्हती ती वेगवेगळया ठिकाणाहून घ्यावी लागली ३)सेवा पुस्तकांत व रजेच्या प्रकरणी नोंदी घेणे व त्यात काही त्रृटी असणे या कारणास्तव निवृत्ती वेतन काढण्यास उशीर झाला ४) प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनीही व्दितीय अपील सुनावणीपूर्वी अपीलार्थीस माहिती दिलेली आहे. ५) वैद्यकिय देयक मंजूर झालेले असून ते त्यांना देय आहे. या सर्व बाबतीत वेळ लागणे अपरिहार्य आहे त्याप्रमाणे प्रकरण तरी विहित वेळेत झाले नसले तरी इतर महत्वाच्या कामामुळे व त्रृटीचे निरसन करण्यास वेळ लागला हे मान्य करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे अपीलार्थीने दि. ३०.०७.२००९ रोजी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या समोर मिळालेल्या माहितीची खात्री करुन घेतलेली दिसून येते त्यामुळे अपीलार्थीस सर्व माहिती मिळालेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १७.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/तक्रार क्रमांक २३७/०२**

**श्री. रुपचंद लौगाणी** **------ तक्रारकर्ता**
**६,फौंटन हेड,सहकारी गृ.नि.संस्था (म),**
**१३३,एस.व्ही.रोड, खार (पश्चिम),मुंबई ४०० ०५२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी वॉर्ड,चंदनवाडी,मुंबई ४०० ००२**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने) ,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी वॉर्ड,चंदनवाडी,मुंबई ४०० ००२**

## - वि वे च न -

श्री.रुपचंद लौंगाणी यांना त्यांच्या दिनांक १७.०१.२००७ च्या माहिती अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती न दिल्यामुळे तसेच दिनांक २.०३.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक २.०४.२००७ रोजी दिलेल्या आदेशाने समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर अपिलावर मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्याकडे दिनांक २०.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही प्रथम अपीलीय प्राधिकारी,जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते. व्दितीय अपीलाची कागदपत्रे तपासून मा.राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दिनांक ६.०३.२००७ च्या पत्रान्वये विलंबाने जी माहिती दिली त्याची कारणमिमांसा लक्षात घेऊन भविष्यात अशी घटना घडणार नाही याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देऊन दिनांक २०.०८.२००८ च्या आदेशान्वये अपील निकाली काढले होते.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीची सूचना सुनावणी होऊन गेल्यानंतर प्राप्त झाल्याने दिनांक २०.०८.२००८ रोजी आयोजित केलेल्या अपील क्रमांक ६७१/०२ वर पुनः एकदा सुनावणी घेण्याबाबत श्री. रुपचंद लौंगाणी यांनी दिनांक १३.१२.२००८ रोजी मा.राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्याकडे तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रारीवर बृहन्मुंबई खंडपीठासमोर दिनांक १९.०६.२००९ रोजी प्रथमतः सुनावणी आयोजित केली होती तथापि त्यावेळी सतक्रारदार, प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित होते त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १५.०७.२००९ रोजी आयोजित करण्यात आली. त्या दिवशी उत्तरवादी तर्फे विद्यमान जन माहिती अधिकारी व सहायक अधिकारी (इ.व का.),सी विभाग हे उपस्थित होते. तक्रारदारांनी सुनावणीस उपस्थित राहता येऊ शकत नसल्याने ती पुढे ढकलण्याबाबत दूरध्वनीवरुन विनंती केली.

दरम्यान तक्रारदार श्री.रुपचंद लौंगाणी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या मुख्यालय तसेच बृहन्मुंबई खंडपीठाकडे प्रलंबित असलेल्या अन्य तक्रारी/व्दितीय अपीलांवर मा.राज्य मुख्य माहिती आयुक्तांसमोर एकाच तक्रारीवर सुनावण्या आयोजित करण्याबाबत निर्णय झाल्याने प्रस्तुत तक्रारीवर (तक्रार क्रमांक २३७/बृहन्मुंबई खंडपीठ) मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचेसमोर दिनांक २६.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि श्री.लौंगाणी यांनी त्यांच्या दि.१४.०८.२००९ च्या पत्रान्वये सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती माहे सप्टेंबर २००९ च्या दुसऱ्या आठवडयात ठेवावी असे आयोगास कळविले. त्यानंतर प्रस्तुत तक्रारीवर आयोगाने दिनांक १७.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती तथापि काही अपरिहार्य कारणामुळे सुनावणीची तारीख व वेळ बदलण्यात येऊन ती दिनांक १९.०९.२००९ रोजी ठेवण्यात आल्याचे आयोगाने दिनांक ८.०९.२००९ च्या पत्रान्वये सर्व संबंधीतांना कळविले. त्यावर परत तक्रारदार,श्री.लौंगाणी यांनी त्यांच्या दिनांक १२.०९.२००९ च्या पत्रान्वये दिनांक १९.०९.२००९ रोजीची सुनावणी पुढे ढकलण्याबाबत विनंती केली होती. तक्रारदाराच्या विनंतीस अनुसरुन प्रस्तुत तक्रारीवर दिनांक १६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.सुनावणीच्या वेळी तक्रारदार अनुपस्थित होते. उत्तरवादी तर्फे श्री.शिरीष य.दिक्षित,जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते.

तक्रारदार, श्री लौंगाणी हे सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाही याबाबत त्यांनी आयोगास कळविलेले उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते नाही.

पस्तुत तक्रारीचे तसेच बृहन्मुंबई खंडपीठाच्या अपील क्रमांक ६७१ च्या मूळ नस्तीतील कागदपत्रांची छाननी केली असता मा.राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांनी अपील क्रमांक ६७१ प्रकरणी दिनांक २०.०८.२००८ रोजी जो आदेश पारित केलेला आहे त्यावर अपीलव्दारा वा तक्रारीव्दारा रिव्हयू करण्यासारखी कायद्यात तरतूद व परिस्थिती नाही.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१२९/अपील क्रं. ५२३९/०२**

**श्री. रुपचंद लौगाणी** ------ **तक्रारकर्ता**
**६,फौंटन हेड, सीएचएस लि.,**
**१३३,एस.व्ही.रोड, खार (पश्चिम),**
**मुंबई ४०० ०५२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**विधी अधिकारी, विधी अधिकारी,विधी विभाग,**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विधी अधिकारी,विधी विभाग,**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१**

## - वि वे च न -

श्रीयुत लौंगाणी यांचा कलम सहा खालील अर्ज दि. ८ जुलै, २००९ रोजी विधी विभागाकडे

व जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त दि. १० जुलै, २००९

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा दिनांक :- ६.०८.२००९

प्रथम अपीलाचा दिनांक :- २७.०८.२००९

सुनावणीचा दिनांक :- १६.०९.२००९

प्रथम अपीलावरील आदेश पारित केल्याचा दिनांक :- २२.१०.२००९

व्दितीय अपीलाचा दिनांक :- २९.१०.२००९

सुनावणीची तारीख :- २०.०१.२०१०

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी :- उपस्थित

अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा क्रमांक बी व ई च्या बाबतीत विधी विभागाकडे लिगल असिस्टंट यांनी सादर केलेला अहवाल व विधी विभागाने चिफ मेट्रोपॉलीटन मॅजिस्ट्रेट यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत गोपनिय म्हणून देण्यात आली नव्हती. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ही दोन्ही कागदपत्रे अर्जदारास देण्याचे निर्देश दिलेले आहेत

व त्याप्रमाणे अर्जदारास ते मिळालेले दिसतात. अर्जदाराच्या मुद्दा क्रमांक एफ च्या बाबतीत एवढेच म्हणता येईल की जो रिपोट मेट्रोपॉलीटन मॅजिस्ट्रेट यांनी सादर केलेला आहे त्याची प्रत अर्जदारास देण्यात आलेली आहे. अर्जदारास त्यात काही तृटी आहेत असे वाटत असेलतर त्या तृटी ते कोर्ट किंवा महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणू शकतात. अर्जदाराच्या अर्जातील क्रमांक जी च्या बाबतीत आपण रिवीजन ॲप्लीकेशन करणार आहात का अशा पध्दतीच्या प्रश्नावर नस्तीत कागदपत्र नसल्यामुळे त्याचे निश्चित उत्तर देता येणार नाही हे खरेच आहे व एक प्रकारे हे त्या आदेशावरील मत मागविल्या सारखे होईल विभागाने रिवीजन ॲप्लीकेशनचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे रिवीजन ॲप्लीकेशन सादर केलेतर ती माहिती देता येईल पण आपण अमुक गोष्ट करणार आहे का याची माहिती जो पर्यंत अंतिम निर्णय होत नाही तो पर्यंत देणे शक्य होणार नाही ही बाब मान्य करण्यात येत आहे. मुद्दा क्रमांक एच च्या बाबतीत ऑफेन्स शीट टॅम्पर केलेले आहे ती का अशा प्रकारच्या प्रश्नावर अर्थातच अर्जदार ही गोष्ट गृहीत धरतात मात्र त्यांना ऑफिस शिटची प्रत निश्चित पणे प्राप्त करुन घेता येते व ती टॅम्पर झालेली आहे असे वाटत असेलतर ती निश्चित पणे संबंधित प्राधिकाऱ्याकडे कारणे देऊन तक्रार करु शकता. मुद्दा क्रमांक आय च्या बाबतीत लिगल असिस्टंटने कोर्टात हॅंडल केलेल्या केसेसची माहिती विचारली आहे. या माहितीत जर अर्जदाराने निश्चित कालावधी नमूद केलातर किंवा विवक्षित केस नमूद केलीतर माहिती देता येणे शक्य होते. तसेच ट्रायल केसेसच्या बाबतीत रिवीजन ॲप्लीकेशन सादर केलेले आहेत अशा पध्दतीचा गोषवारा जर विधी विभाग ठेवत असेलतर त्याच्या प्रती निश्चितपणे देता येईल, नाही तर विवक्षित केसेसच्या बाबतीत जर अर्जदाराने विचारलेतर त्या बाबतची माहिती देता येईल.

अर्जदाराच्या दिनांक ११.०५.२००९ रोजीचा अर्ज कसा हाताळला गेला याबाबत अर्जदारास हवी असणारी माहिती याबाबत वास्तविक पाहता या विषयाच्या बाबतीत जर वेगळी नस्ती असेलतर त्याच्या डॉकेट शिटवरुन किंवा नस्तीमधील नोट शिटवरुन सदरील तक्रारच्या बाबतीत कशी कारवाई होत गेली हे अर्जदारास कळविता येऊ शकले असते. त्यामुळे डॉकेटशिटची प्रत किंवा नोटशिटच्या तारखांवरुन प्रकरण कोणाकडे कोणत्या कोणत्या तारखेला गेले याची माहिती संकलित करुन किंवा नोटशिटची प्रत देऊन किंवा तारखांचा गोषवारा काढून देता येईल. आवश्यक असल्यास दोन्ही प्रती किंवा डॉकेटशिट किंवा नोटशिट यापैकी ज्यामध्ये परिपुर्ण माहिती असेल तर त्याच्या प्रती अर्जदारास देण्यात याव्यात.

अर्जदारास आवश्यक वाटत असेलतर अर्जदार संबंधीत नस्तिचे अवलोकन करुन कागदपत्रांचे टेम्परींग बाबतीत त्याची खात्री करुन घेऊ शकतात. तपासणी अंती त्यांना जर काही माहितीची कागदपत्रे अतिरिक्त माहिती म्हणून पाहिजे असेलतर त्याच्या प्रतीही देण्यात याव्यात. दिलेल्या माहिती वरुन असे दिसते की अर्जदाराच्या दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या तक्रार अर्जावर ज्युनिअर लिगल असिस्टंट यांनी दिनांक १८.०६.२००९ रोजी त्यांचा अहवाल पाठविलेला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांच्या मनात माहिती कोर्टाला सादर केली असल्यामुळे ती गोपनिय धरावी किंवा द्यावी याबाबत त्यांना संभ्रम असल्यामुळे त्यांनी ती गोपनिय धरलेली आहे. मात्र याबाबत त्यांचा असदहेतू आहे असे दिसत नाही व अपिलीय अधिकारी यांनी ही माहिती देण्यात यावी असे निर्देश दिल्या नंतर ही माहिती अर्जदारास देण्यात

आलेली आहे. आता प्रश्न राहिला तो अपिलीय अधिकारी यांनी अपीलाचा निर्णय घेण्यात जास्त काळ लावलेला आहे. शक्यतो ३० दिवसांच्या आत व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवस हे अपीलावर निर्णय देण्याचे बंधन आहे. मात्र सदरील केसमध्ये अर्जदाराचे अपील २७.०८.२००९ रोजीचे असल्यामुळे २७.०९.२००९ पर्यंत अपीलाचा निर्णय सर्वसाधारण परिस्थितीत किंवा दिनांक ११.१०.२००९ पर्यंत अपवादात्मक परिस्थितीत घेणे आवश्यक होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचा आदेश हा दिनांक २२.११.२००९ रोजी दिलेला आहे. अपवादात्मक परिस्थितीत का उशिर केला याचे विवेचन त्यांच्या आदेशात नाही. याबद्दल अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे व त्याची नोंद गोपनिय अहवालात घेण्यात यावी अशीही शिफारस आयोग महापालिकेस करत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी व महापालिका आयुक्त यांनी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी. या आदेशाची प्रत महापालिका आयुक्त यांनाही देण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ७७ /०२**

**श्री.जगन्नाथ भिका बाविस्कर** ------ **अपीलकर्ता**
**रा. विद्याविहार कालनी, प्लॉट नं. ६,**
**चोपडा, ता.चोपडा.जि.जळगाव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**सह आयुक्त, अनुसमचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी विकास भवन, नंदुरबार,जि.नंदुरबार,**

**जन माहिती अधिकारी तथा**
**संशोधन अधिकारी, अनुसमचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी विकास भवन, नंदुरबार,जि.नंदुरबार,**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.जगन्नाथ भिका बाविस्कर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.०३.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) जळगांव जिल्हापरिष्द पंचायत समिती निवडणूकीपूर्वी दि. ५.१०.२००६ रोजी अर्जदाराने टोकारी-कोळी जातीचे प्रमाणपत्र वैधतेच्या पडताळणीसाठी पाठविले आहे त्याचे काय झाले. २) टोकारी-कोळी या जमातीची किती प्रस्ताव पडताळणीसाठी पाठविण्यांत आले त्यात वैधता व अवैधता किती. इत्यादि अनुषंगाने १० मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जावर कोणताही निर्णय घेतला नाही अथवा कोणत्याही प्रकारे कळविले नाही. त्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनीही त्याच्या अपीलाची दखल घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत त्यामुळे व्यथीत होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी फक्त अपीलार्थी हजर होते तर प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी गैरहजर होते.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळी नजरेस आलेली वस्तुस्थिती :- १) महत्वाच्या सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते तर उत्तरवादी अनुपस्थित होते. २) प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या प्रथम दिनांक २७.०३.२००८ ते आयोगाकडील अपील दाखल करेपर्यंत कोणतेही निर्णय घेतलेले नाहीत. ३) अपीलार्थीचे म्हणणे की वारंवार सांगूनही त्यांनी कोणतेच उत्तर दिले नाही त्यामुळे त्यांना मानसिक त्रास झाला अपीलार्थी याबाबत मागील २ वर्षापासून पडताळणी समितीच्या कामाबद्दल त्यांनी वारंवार तक्रारी केलेल्या आहेत.

एकंदरित या प्रकरणाचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की उत्तरवादी दोन्ही अधिकारी वरिष्ठांनी सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ दिसले. जन हिताची जाण नसलेले अधिकारी अशा महत्वाच्या ठिकाणी नेमल्यास त्याचा समाजात चुकीचा संदेश जातो व त्यामुळे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही त्याचा नाहक त्रास होतो.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस जाणून-बुजून माहिती देण्याचे टाळले आहे तसेच वरिष्ठांचे आदेशही पाळलेले नाहीत आयोगाच्या महत्वाच्या सुनावणीस ही ते मुद्दामच गैरहजर राहिले असे दिसते एकूण त्यांचा काम करण्यास अकार्यक्षमता दिसून येते या कारणास्तव त्यांच्यावर रु. ५,०००/- रु. ची शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या १ जून २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास १ जुलै, २०१० पर्यंत चलनाच्या प्रतीसह पाठवावा. तसेच अपीलार्थीस १० दिवसांत मोफत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही कामात टाळाटाळ केलेली आहे त्यांनी जबाबदारीचे भान ठेवावयास हवे यापुढे त्यांनी कामात कसूर केल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यांत येईल हे लक्षात ठेवावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी शास्ती वसुलीची कार्यवाही करावी**
**व अपीलार्थीस माहिती देण्याचे निर्देश द्यावेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ४९ /०२**
**मुमाआ २००९/अपील क्रं. ५० /०२**

**श्री.सुर्यवंशी घनश्याम दिलीप,** **------- अपीलकर्ता**
**९९, शिवाजी नगर, नायण खेज रोड,**
**हनुमान मंदिराजवळ, भडगांव, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, धुळे,जि.धुळे.**

**जन माहिती अधिकारी**
**संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र**
**पडताळणी समिती क्र.२, मुख्यालय धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.११.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.सुर्यवंशी घनश्याम दिलीप, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली श्री.सुर्यवंशी तुषार दिलीप याचे जातपडताळणी प्रकल्प रु.२००५-२००६ मध्ये ज्यु.कॉलेज चाळीसगांव येथून तपासणीसाठी पाठविण्यांत आले होते. अर्जात त्रृटी असल्यास त्रृटी पत्राची प्रत २) प्रकरण प्रलंबित ठेवण्याचे कारण माहिती न्यायलयीन कार्यवाहीसाठी आवश्यक असल्याने त्वरीत माहिती मिळावी.

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी धुळे यांनी अपिलार्र्थी यांना दिनांक ११.०७.२००९ रोजी केलेला अर्ज हा. मा.संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी मुख्यालय धुळे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी वेळेत हस्तांतरीत करण्यात आला तसे अपीलार्थीस कळविण्यांत आले.

अपीलार्थीस जात पडताळणी विभागाकडे पत्रव्यवहार करुन व प्रत्यक्ष कार्यालयांत जाऊनही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतु त्यावरही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाही. म्हणून

व्यथीत होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी तिघेही गेरहजर होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १) अपिलार्थीने सन २००५-२००६ या वर्षात जात पडताळणीसाठी अर्ज केलेला आहे. २) माहिती अर्ज जुलै २००९ मध्ये प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीच माहिती पुरविली नाही किंवा पडताळणीसाठी केलेल्या अर्जात त्रृटी असल्यास तसेही लेखी कळविले नाही. ३) जन माहिती अधिकारी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्याने त्यांनी ६/७ महिन्यात अपिलार्थीच्या अर्जावर काय कार्यवाही केली याचा काहीच अर्थ बोध होत नाही. जात पडताळणी वेळेत झाली नाही तर बऱ्याच प्रकरणांत त्यात्या जातीच्या व्यक्तीस अडचणी येतात. हे समजू शकते तरी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जावर कोणतीही वृत्ती केलेली नाही किंवा त्यांनी ही बाब गांर्भीयाने घेतलेली दिसत नाही तरी त्यांना या प्रकरणांत चालढकल केल्याबद्दल रु.२०००/- ची शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या १ जून, २०१० मध्ये होणाऱ्या वेतनांतून वसूल करण्यांत यावी व सदर रक्कम शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास १ जुलै, २०१० पर्यंत अवगत करावा. जन माहिती अधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. लवेसु २००७/प्रक्र७४/यावल -५/दिनांक २२/०८२००७ चे अवलोकन करुन अपीलार्थीस २० दिवसात त्यांच्या अर्जावर काय कार्यवाही केली हे लेखी कळवावे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही अशा महत्वाच्या प्रकरणी डोळेझाक केलेली दिसून येते तरी यापुढे जबाबदारी ओळखून काम करावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २८.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र.मुमाआ/अपील/नाशिक/२००९/सीआर-१६१०/०२**

**श्री.शेख मो.बशीर इस्माईल ------ अपीलकर्ता**
**रा.१५०९, लक्ष्मीबाई डेरे,कॉलनी, पिंपळगांव बसवंत,**
**ता.निफा४ड,जि.नाशिक - ४२२ २०९**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विभाग नियंत्रंक, परिवहन महामंडळ,नाशिक विभाग,**
**नाशिक, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभाग नियंत्रंक, परिवहन महामंडळ,नाशिक विभाग,**
**नाशिक, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : २०.०५.२००८ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | : ११.०६.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | : १७.०६.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | : ९.०७.२००८ |

श्री शेख मो.बशीर इस्माईल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द दि.१५.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. कलम १९ (३) खालील या अपिलाची सुनावणी नियोजन हॉल जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक,जि.नाशिक येथे दि.२२.१२.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी श्री.शेख अनुपस्थित होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :**

अपीलार्थी श्री.शेख यांनी दिनांक २०.०५.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे पत्र क्र. १३७६,दिनांक ६.११.२००७ चे पत्रानुसार पिंपळगांव बसवंत बर स्थानकात जाऊन कॉल शिटमध्ये एंट्री करतात का. जर वाहन चालक स्थानकात जाऊन लॉग शिटमध्ये एंट्री करीत नसतील तर त्यांच्यावर दंडात्मक किंवा अपराधीन कारवाई का केली जात नाही या अनुषंगाने इतर अनेक मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर:**

सदरची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांची चौकशी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना पत्र पाठवून मागितलेली होती खरे तर सदरहू माहिती वाहतूक संबंधांत असल्यामुळे त्यांनी अर्ज जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी नाशिक यांच्याकडे करणे आवश्यक होते. दिनांक ११.०६.२००८ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस वेळेत अधिनियमानुसार वेळेत कळविण्यात आले होते. परंतु माहिती मिळाली नाही याकारणास्तव प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०६.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :**

प्रत्यक्षात अपिलार्थीने मागितलेली माहिती ही राज्य परिवहन महामंडळाच्या अखत्यारातील असुन वाहतुक संबंधीत निगडीत असल्याने त्या विभागाने नियुक्त केलेल्या जन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या आधीन राहून प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त आहे व त्यानुसार अपिलार्थीस विहित नमूण्यात अर्ज करण्यास सांगण्यात आले होते. त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

**सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :**

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते परंतु अपिलार्थी श्री.शेख अनुपस्थित होते. अपीलार्थीने अनुक्रमांक १ ते ७ व ९ ची माहिती प्रश्नाच्या स्वरुपात मागितलेली होती अधिनियम २००५ नुसार लिखीत स्वरुपात कार्यवाही झालेल्या प्रकरणाची माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. प्रश्नांना उत्तरे देण्याची तरतूद नाही मुद्या क्रं.५ व ११ ची माहिती अपिलार्थीस दि.१९.१२.२००९ च्या पत्राव्दारे देण्यात आलेली आहे. मुद्या क्र.१० ची माहिती उच्च न्यायालयीन प्रकरणी असल्याने ती उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही. हे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे म्हणणे योग्य आहे. मुख्यत: अपिलार्थी सुनावणीस हजर नसल्याने त्यांचे म्हणणे नक्की काय आहे व माहिती कशा प्रकारे हवी आहे याचा कोणताच अर्थबोध होत नाही तरीही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लिखित म्हणण्यानुसार उर्वरित माहिती अपिलार्थीस वेळेत व विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २८.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ४८ /०२**

**श्री. वसंतराव मारोतीराव पाटील,** **------- अपीलकर्ता**
**रा.भोरा, ता.मुक्ताईनगर, पो.पिंप्राळा,**
**जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तालुका कृषि अधिकारी, मुक्ताईनगर,**
**जि. जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मंडळ कृषि अधिकारी, कुऱ्हा मुक्ताईनगर, बोदवड रोड,**
**जि. जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०७.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०३.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. वसंतराव मारोतीराव पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,परिसर जळगांव येथे दि. ०५.०३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते, तर जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) भोटा गावात आपण २००९ पासून अनुदानाची किती कामे केली २) कामे कोणती ३) शेत तलाव किती केलेले आहेत. ४) शेत तलावाचा व्यास शेतकऱ्याचे नांव व गट नं. तयाचे दिलेले अनुदान त्याचीप पध्दत यांची २००१-२००९ पर्यंतची माहिती ५) भोर मंडळांत २००१-२००९ पर्यंत शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून दिलेले सामान. ६) सभासद निवडणे निकस इत्यादि. माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीच माहिती दिली नाही म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावरही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेशही पारित केले नाहीत म्हणनू अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी उपस्थित होते

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- १)अपीलार्थी यांनी केलेल्या अपीलावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही भाष्य केले नाही. २) जन माहिती अधिकारी यांनी काहीतर सांगायचे म्हणून केलेली कामे यांची माहिती संस्थेच्या अध्यक्षाकडून घ्यावी असे नमूद केले आहे ३) अपीलार्थीस यांचे म्हणणे आहे की यापूर्वीही शेतीच्या नुकसानाची व अनुदानाची माहिती मागितली होती तीही त्यांनी दिलेली नाही. या कालावधीत अपीलार्थीस आर्थिक व मानसिक त्रास झाला.

एकंदरीत या प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध असून ती न देण्याची कसूर केली आहे. २) जन माहिती अधिकारी यांना सोपविलेली जबाबदारी टाकल्यावर कल दिसून येतो. ३) माहिती विलंबाने का होईना तरी देता आली असती परंतु त्यांना कोणती जबाबदारी स्विकारवयाची दिसत नाही त्यामुळे त्यांच्या या बेजबाबदारपणावर रु. ५,०००/- रु. ची शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या १ जून,२०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास २० जून, २०१० पर्यंत अवगत करावा. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही अपीलार्थीस माहिती उपलब्ध कशी करुन देता येईल ते प्रत्यक्षांत पहावे तसेच शास्ती वसुलीची कार्यवाही योग्यरित्या पार पाडावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**संबंधीतानी उपरिनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २८.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४६४२४/अपील क्रं. ५६३९ /०२**

**श्री. सुरेंद्र मारुती मोहिते,** **------- अपीलकर्ता**
**२५२/१, डॉ.आंबेडकर चौक, कुर्ला (प),**
**मुंबई ७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (परिरक्षण), बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एल वॉर्ड, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यालय अधीक्षक, बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एल वॉर्ड, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०१.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३०.०४.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीने असे सांगितले की अर्जदारास हवी असलेली श्रीयुत कांबळे यांच्या सेवे संबंधीची सर्व उपलब्ध माहिती देण्यात आलेली आहे. तसेच सिटीजन चार्टरची प्रत सुध्दा एका आठवडयाच्या आत पाठविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीयुत मोहिते स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे कोणत्या मुद्यांच्या बाबतीत समाधान झाले नाही हे कळू शकले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**
**सिटीजन चार्टरची प्रत सात दिवसात पाठविण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ /अपील/नाशिक/२००९/सीआर १५०७/०२**

**श्री. रमेश अग्रवाल,** **------- अपीलकर्ता**
**१०७, इंद्रलोक, त्रिवेणी पार्क,**
**रिलायन्स फ्रेश समोर, जेलरोड,**
**नाशिक रोड, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अधीक्षक अभियंता, नाशिक महानगरपालिका,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.),नाशिक महानगरपालिका,**

**नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक २१.०२.२००९ च्या अर्जान्वये १९९८ मध्ये स्लुईस व्हाल्व च्या खरेदीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. तसेच खरेदीच्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती.

उपरोक्त अर्जाला दिनांक १७.०३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी खालील उत्तर दिले.

सदर कामाची मूळ नस्ती उपलब्ध करण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.या बाबतची माहिती दि. १.०५.२००९ पर्यंत कळविण्यात येईल.

यानंतर दिनांक २२.०४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा असे कळविले की अभिलेखे उपलब्ध होत नसल्याने आपणांस दाखविता येत नाहीत. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १४.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दिनांक २५.०५.२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले त्यानुसार अपीलार्थीस आठ दिवसांच्या आत कागदपत्रे देण्याचे निदेश दिले होते.

यानुसार अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली परंतु ती अर्धवट असल्याचे कारण नमूद करुन अपीलार्थीनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आयोगास सादर केले की सन १९९८ ची नस्ती सापडत नसल्याने इतर ठिकाणांहून कागदपत्रे एकत्र केली व ती अपीलार्थींना पुरविण्यात आली. याबाबत आयोगाचे असे असे मत आहे की नस्ती सापडत नाही ही सबब कागदपत्रे न देण्यासाठी सांगणे उचित नाही. कार्यालयीन कागदपत्रे जतन करणे ही कार्यालयाची जबाबदारी असून ती पार पाडण्यास कुचराई झाल्यास नस्तीचे जतन करण्यास जबाबदार व्यक्ती महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार शास्तीस पात्र ठरते तेव्हा या तरतुदींची जाणीव उत्तरवादींना आयोग करुन देत आहे. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की नस्तीचा कसून शोध घेण्यात यावा व त्यातील कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीस विनाशुल्क त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करुन द्याव्या. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ /अपील/नाशिक/२००९/सीआर १४९३/०२**

**श्री. राजन आनंदराव बच्छाव** ------- **अपीलकर्ता**
**डी-११२, एमआयडीसी, अंबड,**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट),१ ला मजला, विक्रीकर भवन,**
**पाथर्डी फाटा, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.विक्रीकर आयुक्त (व्हॅट), १ ला मजला, विक्रीकर भवन,**
**प्रशांत नगर, पाथर्डी फाटा, नाशिक-१०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १७.०३.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दिनांक ३.१०.२००८ च्या अर्जान्वये सन २००१ ते सन २००८ या कालावधीची खालील माहिती मागितली.

१) उपरोक्त कालावधी मध्ये कोणकोणत्या विक्रेत्यांवर पोलीस केस फाईल केली.

२) सर्वांनी रिटर्न वेळेवर भरले होते काय ?

३) ज्यांनी रिटर्न वेळेवर भरले होते त्या विक्रेत्यांची यादी. इत्यादि.

उपरोक्त अर्जाला दिनांक १०.११.२००८ रोजी उत्तर देण्यात आले. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दिनांक १६.०२.२००९ रोजी असा निर्णय देण्यात आला की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींनी विचारलेली माहिती पुरवावी.

तथापि त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींतर्फे असे सादर करण्यात आले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. परंतु अपीलार्थींचे असे म्हणणे आहे की प्राप्त माहितीबाबत समाधानी नाही. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की जन माहिती अधिकारी यांनी दिनांक व वेळ नमूद करुन अपीलार्थींना कार्यालयात बोलवावे व त्यांनी

विचारलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावे. यातील ज्या अभिलेख्यांच्या छायांकित प्रती अपीलार्थींना हव्या असतील त्या विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २०१०/४०४६०/अपील क्रमांक ३९०८/०२**

**श्री. भोला हुकुमचंद तांबोळी** **------- अपीलकर्ता**
**१५, क्वीन्स गार्डन, पुरंदर बिल्डिंग नं.क्यू,**
**रुम नं.६८, पुणे ४११ ००१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३०.०४.२००९
सुनावणीचा दिनांक : १९.०४.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक १४.७.२००८ च्या अर्जान्वये सफाई कामगारांच्या नातेवाईकाला वारसा हक्काने नियुक्ती देण्याविषयी एकूण ३० मुद्यांवर माहिती मागितली. अपीलार्थींनी मागितलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक ९.०१.२००९ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले. यावर दि. २३.०१.२००९, ४.०२.२००९, १८.०२.२००९ रोजी सुनावणी आयाजित करण्यात आली होती. पण काही कारणास्तव सुनावणी होऊ शकली नाही. दिनांक २१.०२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात येऊन दिनांक ३ मार्च, २००९ रोजी आदेश पारित करण्यात आले.

या प्रकरणाशी संबंधित माहिती यापूर्वीच दिल्याचे माहिती अधिकारी यांनी नमूद केलेले आहे. त्यामुळे आता वेगळी अशी माहिती देण्याची आवश्यकता दिसत नाही.

या आदेशान समाधान न झाल्याने अपीलार्थींनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावर आयोगाच्या बृहन्मुंबई खंडपीठासमोर दिनांक १५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. पण सुनावणीच्या वेळी घडलेल्या काही अप्रिय घटनांमुळे ही सुनावणी मुख्य माहिती आयुक्तांकडे व्हावी अशी विनंती बृहन्मुंबई खंडपीठाने केल्यामुळे राज्य मुख्य माहिती आयुक्तांसमोर दि. १९.०४.२०१० रोजी सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी

त्यांचा दिनांक १७.०४.२०१० रोजीचा लेखी खुलासा व अपीलार्थीच्या माहिती अर्जातील मांडलेले एकूण ३० मुद्दे याचे अवलोकन केले असता असे दिसते की माहिती अर्जातील मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहेत. तसेच अपीलार्थींनी त्यांची धारणा पक्की करण्याची मागणी केली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की माहिती अधिकाराच्या अंतर्गत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षित आहे. उपलब्ध माहितीचा वापर करण्यास अपीलार्थींना मुभा असते तेव्हा माहितीच्या अधिकाराखाली खुलासा मागणे, काय कारवाई करणार अशी विचारणा करणे, धारणा निश्चित करण्याची मागणी करणे या अधिकाच्या कक्षेत बसत नाही. सुनावणीच्या वेळी आयोगाच्या समोर आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसते की अपीलार्थींना सर्व ३० मुद्यांबाबत जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले आहे तसेच संबंध्द (relevant) कार्यालयीन टिप्पणीच्या प्रती पुरविल्या आहेत. याशिवाय अपीलार्थींना सदर प्रकरणाशी संबंधित आणखी काही जाणून घ्यावयाचे असल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाच्या कलम २ (जे) (i) च्या तरतुदीनुसार कार्यालयीन अभिलेखे बघण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे असे आयोगाचे निदेश आहेत. अभिलेख्यांच्या तपासणीसाठी दिनांक व वेळ अपीलार्थींच्या संमतिने ठरवून निश्चित करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २०१०/४०४६०/अपील क्रमांक १४६९/०२**

**श्री. जे.एन. लगड,** **------- अपीलकर्ता**
**महाराष्ट्र लोक.ग्राह.पंचायत,**
**व्दारा-श्रीराज बंगला नं.२०, इंदिरानगर,**
**नाशिक, ता.जि.नाशिक ४२२ ००९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप विभागीय अधिकारी, महसूल उपविभाग,**
**जि. औरंगाबाद.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार, पैठण जि.औरंगाबाद**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३०.०४.२००८
सुनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दिनांक ७.१२.२००७ च्या अर्जान्वये मौजे पाटेगांव व पाटेगांव ता.पैठण येथील पुलापासून पुर्वेकडे नदी पात्रातील ज्या ठिकाणाहून वाळू उत्खनन व वाहतूक चालू आहे तिथून पुढे पाच कि.मी. पर्यंतचे मंजूर झालेल्या सर्व निविदांची माहिती व त्यावरील चौकशी अहवालाची प्रत मागितली.

या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ५.०२.२००८ रोजी अपीलार्थींना उत्तर दिले. परंतु या उत्तरावर समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दिनांक ७.०४.२००८ रोजी निर्णय होऊन त्यानुसार अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार आठ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. या निर्णयाने समाधान न झ ााल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादींचे म्हणणे ऐकूण आयोगाचे असे निर्देश आहेत की प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना त्यांच्या मुळ अर्जात मागणी केल्यानुसार

माहिती पुरवावी. सदर प्रकरणी माहिती देण्यास विलंब झालेला असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट निर्देशाप्रमाणे माहिती पुरवावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०४.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६११/०२

श्री.मुकुंद गुडीमेला — अपिलार्थी
रुम नं. ९५, बिल्डिंग नं.६६ समोर,
आंबेडकर चौक, गुरुकृपा सोसायटी,
घाटकोपर पूर्व,मुंबई ७५

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव — --उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण,
५ वा मजला, म्हाडा, वांद्रा पूर्व,
मुंबई ५१

जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण,
५ वा मजला, म्हाडा, वांद्रा पूर्व,
मुंबई ५१

विवेचन

अपिलाचा दिनांक ४.१२.२००९
सुनावणीची तारीख दि.१९.४.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अर्जदारास पंतनगर,घाटकोपर येथील गुरुकृपा सोसायटी सी.टी.एस. १९०/९ पार्क, घाटकोपर येथे मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुर्नवसनाच्या सेन्ससच्या नोटीफिकेशनबाबतची माहिती पाहिजे होती. अर्जदारास एस.आर.ए. मध्ये असलेल्या मुंबई बोर्डाच्या पत्रव्यवहाराच्या प्रती देण्यांत आलेल्या आहेत. मात्र अर्जदाराचे त्यामध्ये समाधान झालेले नाही. त्यामुळे अर्जदारास सदरील प्रकरणाची संपूर्ण नस्ती दाखविण्यात यावी व त्यांना हव्या असणा-या प्रती त्यांना त्वरीत देण्यांत याव्यात. तक्रारीत ज्या मुळ २०९ व्यक्तींना पात्र ठरविण्यांत आलेले आहे ते चुकीचे आहे असे त्यांचे म्हणणे दिसते, अशी तक्रार असेल तर संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः २०.४.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१२९/०२

श्री.शब्बीरखॉ महंमद खॉ पठाण -अपिलार्थी
बाहेरपूरा मिर्झा गल्ली, अमळनेर,
ता.अमळनेर जि.जळगांव

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक --उत्तरवादी
भूमिअभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,
जुन्या सी.बी.एस.जवह, शरणपूर रोड,नाशिक

जन माहिती अधिकारी
उपसंचालक, भूमि अभिलेख
भूमिअभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,
जुन्या सी.बी.एस.जवळ, शरणपूर रोड,नाशिक

विवेचन

अपिलाचा दिनांक १३.७.२००९
जळगांव येथे सुनावणी - दि.६.३.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) जमिन एकत्रीकरण योजना शेती मिळकतीस तसेच बिनशेती मिळकतीस पण लागू आहे अथवा कसे २) स्किम पत्रकाची एक बाजू कोरी कशी ३ ) सातबा-यामध्ये ज्या नियमाने खात्यात अदलाबदल न दाखविता खातेकायम ठेऊन गुंठयात केलेली वाढ यांचे नियम इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने दि.१२.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यानच्याकाळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथीस दि.२०.३.२००९ च्या पत्राव्दारे अधिनियम २००५ चे कलम २ (च)नुसार माहिती देता येत नाही असे क्ळविले होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.५.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी झ ाालेल्या चर्चेत अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती देता येत नाही असे नमूद केले. वर एकत्रिकरण संबंधी ज्या नकला आवश्यक असतील त्या

**संबंधीत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कडून प्राप्त करुन घ्यावेत असे स्पष्ट आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.५.२००९ रोजी पारित केले.**

**अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केल्यावर त्यावर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. परंतू प्रथम अपिलीय अधिकरी अनुपस्थित होते त्यावेळी निर्देशनास आलेल्या बाबी :-**

**१. एकत्रिकरणासंबंधी ज्या नक्कला उदा.एकत्रित नकाशा, शेतपुस्तक, पोट हिस्सा नकाश फेरफार इत्यादि आवश्यक माहिती संबंधीत तालुका निरिक्षक भूमि अभिलेख अमळनेर यांच्याकडून प्राप्त करुन घेता येतील. तसेच गट नं.१३ चे ७/१मध्ये ०.५ गुंठे वाढ कां झाली हे अपीलदारास अभिलेखावरुन माहिती करुन घेता येईल. त्यासाठी त्यांनी एकत्रिकरणापूर्वी व नंतरच्या नकाशा तसेच त्यानुसार घेतलेल्या नकला, अर्जदार तालुका निरिक्षक भुमी अभिलेख व एकत्रिकरणापूर्वीचे उतारे, फेरफार संबंधित तहसिलदार यांचेकडून प्राप्त करुन घेता येईल. हे अपिलीय अधिका-याचे विवेचन योग्य आहे.**

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.५.२००९ रोजी केलेले आदेश योग्य असल्याचे आयोगाचे मत आहे.** अर्जदाराच्या अपिलावरुन त्यांच्याकडे सर्व नकला आहेत असे त्यांनी म्हटले आहे. नकला संदिग्ध वाटत असल्यास ते त्या कागदपत्रांच्या मुळ नस्तीची पाहणी करुन त्यांच्या सत्यतेविषयी खात्री करुन घेऊ शकतात.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांकः २०.४.२०१०**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६४०/०२

श्री.चंद्रभान देवराव कांबळे -अपिलार्थी
संताई सदन, नवजीवन रहिवाशी संघ
स.गो. बर्वे मार्ग, कुर्ला पूर्व
मुंबई २४

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला पश्चिम, मुंबई ७०

जन माहिती अधिकारी वैद्यकिय अधिकारी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला पश्चिम, मुंबई ७०

विवेचन

अपिलाचा दिनांक ४.१.२००९
जळगांव येथे सुनावणी - दि.३०.४.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.
अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :-

जुने नांव भोलेनाथ शेव चिवडा व बद्रीप्रसाद ग्रेन स्टोअर्स, नविन नाव न्यू कॉर्नर, कुर्ला पूर्व मुंबई ४०००२४ आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या परवाना व परवान्यासाठी जमा केलेल्या पुराव्याच्या पूर्ण कागदपत्रांची प्रमाणित नकला मिळणेसाठी आपणांकडून देण्यांत आलेला परवाना (सुरुवातीपासून)

मात्र ही माहिती शर्थ करुनही रेकॉर्डला सापडत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशामध्ये त्यांचेकडे सध्या अस्तित्वात असलेल्या लायसन्सची प्रत देण्यांत आलेली आहे असे तरी असले तरी पुन्हा एकदा कागदपत्रे शोधून अर्जदारास हवी असलेली कागदपत्रे देण्याचा प्रयत्न करावा व त्यामध्ये आवश्यकता भासल्यास अनुज्ञाप्ती धारकांना कडून कागदपत्र प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा व अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर दर्शविल्याप्रमणे कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांकः ३०.४.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त